लोकशाहीचा शिलेदार

# न्यूज हब

मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर येथे एकाच वेळी प्रकाशित

कमाल ३३.० से.
किमान २७.० से.
तापमान

सोने-चांदी
- सोने (१० ग्रॅम) - १,५०,०८०/-
- चांदी (१ किलो) - २,४०,०००/-

वर्ष २ । अंक १० । आर एन आय क्र. MHMAR/25/A0849 । आवृत्ति : ठाणे । गुरूवार, ६ ऑगस्ट २०२६ । संपादिका : मनिषा राजेंद्र प्रसाद सैनी । पृष्ठे ८ । किंमत ३ रु.



BORN TO FIGHT FOR RIGHT
NEWS HUB
Mumbai | Navi Mumbai | Thane | Raigad | Palghar
लोकशाहीचा शिलेदार
न्यूज हब
FOR ANY ASSISTANCE
THANE & BEYOND
M. S. MUKHARJI - 9819174601
THANE & NAVI MUMBAI
GANESH UTEKAR - 7304753369
DADAR & BEYOND
PRAVIN SAINI - 7014724511
MUMBAI
SHASHI KUMAR TRIPATHI - 9004707337
PRAKASH PATIL - 90042 91210
Office Helpline - 9376713639
BORN TO FIGHT FOR RIGHT


## सुनेत्रा पवारांवरील टीकेनंतर राष्ट्रवादी आक्रमक

### प्रदेशाध्यक्ष सकपाळांच्या पत्रकार परिषदेत कार्यकर्त्यांची निदर्शने

**मुंबई :** राज्यात राष्ट्रवादीच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करताना काँग्रेसने गुंगी गुडिया असा शब्द वापरल्याने राष्ट्रवादीने तीव्र संताप व्यक्त केला आहे. राष्ट्रवादीचे समर्थक कार्यकर्ते, काँग्रेसच्या मुंबईतील कार्यालयात घुसले होते, विशेष म्हणजे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच राष्ट्रवादीने निषेध आंदोलन केले. तर, सपकाळ यांनी या टीकेचं समर्थन करत, सुनेत्रा पवारांनी कृतीतून दाखवून द्यावे, असे म्हटले. आता, काँग्रेसच्या या टीकेवरुन राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनीही काँग्रेसला लक्ष्य करत थेट इशारा दिला आहे. तसेच, संबंधित ट्विट हटवण्याचीही मागणी केली आहे.

महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांचा अपमान खपवून घेणार नाही. काँग्रेसने केलेल्या अपमानकारक पोस्टबद्दल महाराष्ट्रातील महिलांची व सुनेत्रावहिनींची यांची जाहीर माफी मागावी, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी ट्विट करुन इशारा दिला आहे. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्याविरोधात काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून करण्यात आलेली पोस्ट ही त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या



पुरोगामी महाराष्ट्रात मतभेद असू शकतात, राजकीय संघर्षही असू शकतो. परंतु महिलांचा अवमान करणारी, वैयक्तिक पातळीवर घसरलेली भाषा कधीही स्वीकारली जाऊ शकत नाही, असे सुनील तटकरे यांनी म्हटलंय.

काँग्रेसने माफी मागावी - तटकरे

राजकारणात विचारांचा मुकाबला विचारांनी व्हावा, मुद्द्यांना मुद्द्यांनी उत्तर द्यावे. परंतु जेव्हा एखादा पक्ष महिलांविषयी अवमानकारक भाषा वापरतो, तेव्हा तो आपल्या संस्कारांचा आणि राजकीय संस्कृतीचा खरा चेहरा जनतेसमोर आणतो. महाराष्ट्राची राजकीय परंपरा ही सुसंस्कृत संवादाची आहे, व्यक्तीचा अपमान करण्याची नाही. काँग्रेसने या पोस्टबद्दल महाराष्ट्रातील महिलांची आणि सुनेत्रावहिनी पवार यांची जाहीर माफी मागावी. मतभेद लोकशाहीचा भाग आहेत; मात्र महिलांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, अशा शब्दात सुनील तटकरे यांनी काँग्रेसला इशारा देखील दिलाय. तर, प्रफुल पटेल यांनीही ट्विट करुन निषेध व्यक्त केलाय.

#### काँग्रेसने पोस्ट तात्काळ मागे घ्यावी - प्रफुल पटेल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविषयी काँग्रेसच्या अधिकृत अकाउंटवरून करण्यात आलेल्या अपमानास्पद भाषेचा आम्ही तीव्र निषेध करतो. शिव-शाहू-फुले-आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिलांचा अवमान कधीही स्वीकारला जाणार नाही. ज्या पक्षाचे नेतृत्व सोनिया गांधी आणि प्रियंका गांधी यांसारख्या महिला नेत्या करत आहेत, त्याच पक्षाकडून एका महिला नेत्याविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे. काँग्रेसने संबंधित पोस्ट तात्काळ मागे घेऊन जाहीर दिलगिरी व्यक्त करावी. महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा अपमान कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही, अशा शब्दात प्रफुल पटेल यांनीही या वक्तव्याचा निषेध केलाय.

## गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेसाठी नवी मुंबई महानगरपालिकेची कटिबध्दता



**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेवांमधील गुणवत्ता वाढीकडे बारकाईने लक्ष देत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने आरोग्य सेवांचा नियमित आढावा घेतला जात आहे. या अनुषंगाने आजच्या बैठकीत महापालिका रूग्णालयांमध्ये उपलब्ध करून दिल्या जात असलेल्या आरोग्य सुविधा नागरिकांना समाधानकारक आणि विश्वासार्ह वाटण्याच्या दृष्टीने विविध सुधारणा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. आरोग्य समितीचे सभापती डॉ.जयाजी नाथ आणि समिती सदस्य श्रीम.नेत्रा शिर्के यांच्या उपस्थितीत झालेल्या या आढावा बैठकीप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे, सहा.आरोग्य अधिकारी डॉ.धनवंती घाडगे व डॉ.रत्नप्रभा चव्हाण आणि तिन्ही सार्वजनिक रुग्णालयांचे वैदयकीय अधिक्षक, माता बाल रुग्णालयांचे वैदयकीय अधिकारी व आरोग्य विषयक कार्यक्रमांचे वैदयकीय अधिकारी तसेच नमुंमपा पीजी मेडिकल संस्थेचे डीन डॉ. ज्ञानेश बेलेकर उपस्थित होते.

महानगरपालिका क्षेत्रातील जन्मदर व मृत्यूदराचा वर्षनिहाय आढावा घेताना आयुक्तांनी जन्माच्या नोंदीचा तपशील दैनंदिन स्वरूपात गुगल शीटवर अपलोड करण्यात यावा व त्याच्या दररोज अद्ययावत नोंदी ठेवण्यात याव्यात असे निर्देश दिले. मातामृत्यू व बालमृत्यू यामागील कारणमिमांसा डेथ ऑडिटव्दारे जाणून घेण्यासोबतच त्यानुसार उपचारपध्दतीत सुधारणा करण्यात यावी आणि त्याचा भविष्यातील मृत्यूदर कमी करण्यासाठी उपयोग करून घ्यावा असेही आयुक्तांनी निर्देशित केले. रूग्णांचे व्यवस्थापन अधिक नियोजनबध्द रितीने करण्यासाठी महापालिकेतील डॉक्टरांसाठी इतर तज्ज्ञ डॉक्टरांची प्रत्यक्ष अथवा ऑनलाईन मार्गदर्शक शिबिरे नियमितपणे आयोजित करण्यात यावी व त्यात सातत्य ठेवावे अशा सूचना आयुक्तांनी केल्या. त्याचप्रमाणे महिला गरोदर होण्यापासून प्रसूती नंतरही तिच्या आरोग्याबाबत संपर्कात असणा-या आशा स्वयंसेविका, आशा, ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ यांचीही प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात यावीत व डेथ ऑडिट करताना त्यांचीही उपस्थिती असावी असेही आयुक्तांनी सूचित केले. अनेकदा खाजगी रूग्णालयात प्रसूती झाल्यानंतर एनआयसीयूची गरज भासल्यास व त्या रूग्णालयात त्याची उपलब्धता नसल्यास अशा महिलांना त्यांच्या बाळासह महानगरपालिका रूग्णालयांमध्ये संदर्भित करण्यात येते. मुळात त्यावेळी त्यांची प्रकृती गंभीर असते, त्यामुळे खाजगी रूग्णालयातील डॉक्टरांचेही त्यादृष्टीने समुपदेशन करण्यात यावे तसेच नागरिकांची गरज लक्षात घेऊन आपल्या रूग्णालयांतील एनआयसीयू युनिट्सची संख्या वाढविण्याचेही सूचित करण्यात आले. सिझरिनच्या वाढत्या प्रमाणाच्या कारणांचाही शोध घ्यावा असे त्यांनी सांगितले.

नागरिकांना मोठ्या आजारावरील उपचारांसाठी शासनाचे आयुष्मान कार्ड हे वरदान असून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व लाभार्थी घटकांच्या हातात प्रत्यक्ष आयुष्मान कार्ड मिळण्याच्या प्रक्रियेला वेग द्यावा, त्यासाठी शासन स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करावा असे निर्देशित करतानाच शासन स्तरावर आपणही याबाबत संपर्क साधू असे आयुक्तांनी सांगितले. ही आयुष्मान कार्ड नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शिबिरे घ्यावीत असेही सूचित करण्यात आले. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ नमुंमपा क्षेत्रातील 29 रूग्णालयांमध्ये मिळत असून त्याची यादी लोकप्रतिनिधींना द्यावी व व्यापक रितीने प्रसिध्द करावी अशाही सूचना यावेळी देण्यात आल्या. महापालिकेमार्फत या योजनेसाठी नोडल अधिकारी नियुक्त करावा व आरोग्य मदत कक्ष तयार करावा असेही निर्देश देण्यात आले.

## गायमुख ते घोडबंदर रस्ता दुरुस्ती सुरू इतर; सर्व अफवा-आयुक्त राधाबिनोद शर्मा

**भाईंदर :** ठाणे घोडबंदर मार्गावरील गायमुख ते फाउंटन हॉटेलपर्यंतचा साडे चार की.मी. चा रस्ता दुरुस्तीचे काम ठेकेदाराकडून सुरु आहे मात्र याबाबत सुरू असलेल्या चर्चा या सर्व अफवा आहेत अशी माहिती मीरा भाईंदर महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी पत्रकारांना दिली आहे. ठाणे घोडबंदर मार्गावरील गायमुख ते फाउंटन हॉटेलपर्यंतचा साडेचार कि.मी. लांबीचा रस्ता गेल्यावर्षी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मिरा-भाईंदर महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला होता.राज्यातील सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांपैकी ठाणे-घोडबंदर मार्ग आहे. या मार्गावर अवजड वाहनांची





मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असल्याने रस्त्याची झीज होऊन तसेच पावसाळ्यात जागोजागी खड्डे पडत असल्यामुळे दरवर्षी दुरुस्ती करावी लागते. मात्र, यावर्षी या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या व दुरुस्तीच्या कामास महापौरांनी निधीची कमतरता असल्यामुळे दुरुस्ती शासनानेच करावी, तसेच हा रस्ता पुन्हा शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबत ठराव करून प्रशासनाला आदेश दिले होते त्यामुळे पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटल्यानंतरही या मार्गावरील खड्डे न भरल्याने रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करून रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घेण्याचे आदेश दिले होते. तर शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष राजू भोईर यांनी पोलिस आयुक्तांना पत्र लिहिले आहे की,

राज्य सरकारने या रस्त्याच्या दुरुस्तीची जबाबदारी महापालिकेची असल्याचे स्पष्ट केले असूनही अद्याप कोणतीही रस्ता दुरुस्तीची कार्यवाही झालेली नाही. येत्या ४८ तासांत रस्तादुरुस्ती सुरू न झाल्यास महापौर डिंपल मेहता यांच्यावर कामात अडथळा आणल्या बाबत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तर मीरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाने महापालिका रस्ता दुरुस्त करत नसल्याने पोलिसच ते काम करत असल्याचे सांगितले आहे तसेच याचा व्हिडिओ सुध्दा व्हायरल झाला आहे.

## संसदेत गदारोळ सुरूच

### राम मंदिरातील दानचोरीवरून विरोधक आक्रमक

**नवी दिल्ली :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या १२ व्या दिवशी राम मंदिरातील दानपेटीतील रक्कम चोरीला गेल्याच्या मुद्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये मोठा गदारोळ झाला. मंगळवारी लोकसभेचे कामकाज केवळ १९ मिनिटे चालले. या काळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर सुधारणांशी संबंधित विधेयके मांडली. त्यानंतर सभागृहाचे कामकाज बुधवारपर्यंत तहकूब करण्यात आले.

राज्यसभेचे कामकाज दिवसभरात दोनदा तहकूब करण्यात आले. सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आतच ते तहकूब करावे लागले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. परंतु ते केवळ २० मिनिटे चालले. त्यानंतर दुपारी २ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाले. तत्पूर्वी, राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्यात खडाजंगी झाली. खर्गे यांनी सांगितले की, राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची स्थापना केंद्र सरकारने केली होती आणि सरकारनेच या ट्रस्टला ७० एकरांहून अधिक जमीन हस्तांतरित केली होती. त्यांनी नमूद केले की, राम मंदिराशी संबंधित प्रत्येक कार्यक्रमात खुद्द पंतप्रधान सहभागी झाले होते. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, आता ईडी, सीबीआय आणि इतर केंद्रीय तपास यंत्रणा कुठे आहेत, सरकारने यावर सभागृहात उत्तर दिले पाहिजे, असा आग्रह धरला.

याला उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने काळ्या पट्ट्या बांधून राम मंदिराच्या बांधकामाला विरोध केला होता. ते म्हणाले की, जे लोक पूर्वी



विरोधात होते, तेच लोक आज मगरीचे अश्रू ढाळून देशाला दिशाभूल करू शकत नाहीत. सरकारकडे उत्तरे मागण्यापूर्वी त्यांनी प्रभू रामाचा अपमान केल्याबद्दल आधी देशाची माफी मागावी.

राम मंदिरातून दान-अर्पण चोरीला गेल्याच्या मुद्यावरून काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि राष्ट्रीय जनता दल यांसारख्या विरोधी पक्षांच्या खासदारांनी सरकारचा निषेध केला. राम मंदिरासाठीच्या अर्पणाची चोरी झाल्याचे निदर्शनास आणून देण्यासाठी समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी पक्षाच्या इतर खासदारांसह संसद परिसरात दानपेटी घेऊन आंदोलन केले. लोकसभेचे कामकाज सुरू होताच दुपारी २ वाजता विरोधी पक्षाचे खासदार जागेवरून उठले आणि घोषणाबाजी करू लागले. पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी खासदारांना घोषणाबाजी न करता आपापल्या जागांवर बसण्याची विनंती केली. या गोंधळातच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर आणि इतर कायदे (सुधारणा) विधेयक सादर केले.

## लोकलच्या धडकेत गर्भवती तरुणीचा मृत्यू



**डोंबिवली :** ठाणे जिल्ह्यातील डोंबिवलीत रविवारी सकाळी धक्कादायक घटना घडली. कामावर जाते असे सांगून घराबाहेर पडलेल्या अवघ्या १८ वर्षीय तरुणीचा दिवा-कोपर दरम्यान लोकलच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेनंतर डोंबिवली लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदनादरम्यान संबंधित तरुणी गर्भवती असल्याचे समोर आल्याने पोलिसांच्या तपासाला नवे वळण मिळाले आहे. तपासात मृत तरुणी मूळची रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील असल्याची माहिती समोर आली आहे. लोहमार्ग पोलिसांनी तिच्या कुटुंबीयांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली असून, या संपूर्ण प्रकरणाचा गांभीर्याने तपास सुरू आहे.

## दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

**चंदिगड :** पंजाबमध्ये दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा मोठा कट पंजाब पोलिसांनी उधळून लावला आहे. पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयच्या इशा-यावर काम करत असल्याच्या आरोपाखाली चार अल्पवयीन मुलांसह एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी या कारवाईत तीन बेकायदेशीर पिस्तूल, ९ जिवंत काडतुसे आणि पेट्रोल बॉम्ब तयार करण्यासाठी वापरल्या जाणा-या पेट्रोलच्या चार बाटल्या जप्त केल्या आहेत. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, हे सर्व संशयित परदेशातील आयएसआयच्या हँड्लर्सच्या संपर्कात होते आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली काम करत होते. या तरुणांना दहशतवादी कारवाया करण्यासाठी प्रशिक्षित केले जात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तसेच पंजाबमधील सुरक्षा यंत्रणांवर पाळत ठेवणे, बेकायदेशीर शस्त्रे जमा करणे आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडवणे ही जबाबदारी या संशयितांवर सोपवण्यात आली होती.



तपासादरम्यान आरोपींनी सुरक्षा यंत्रणांच्या हालचाली टिपण्यासाठी आणि संवेदनशील ठिकाणांवर नजर ठेवण्यासाठी रेल्वे रुळांच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याची धक्कादायक माहितीही समोर आली आहे. सध्या पोलिस या नेटवर्कमधील अन्य फरार सदस्यांचा शोध घेत असून त्यांच्या परदेशी कनेक्शनची सखोल चौकशी करत आहेत. पुढील तपासादरम्यान आणखी अनेक महत्त्वाची माहिती उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची माहिती देशभरातील संबंधित सुरक्षा यंत्रणांनाही देण्यात आली आहे.

## हॉटेलमध्ये चॉपर घेऊन घुसला; जीवे मारण्याची धमकी

**ठाणे :** ठाणे रेल्वे स्थानक रोडवरील कॅनन हॉटेलमध्ये मंगळवारी सकाळी धक्कादायक प्रकार घडला. २ हजार रुपये देण्यास नकार दिल्याच्या कारणावरून हॉटेल कर्मचाऱ्यांशी वाद झाल्यानंतर आरोपी धारदार चॉपर घेऊन हॉटेलमध्ये घुसल्याचा आरोप आहे.





आरोपीने शिवीगाळ करत हॉटेल मॅनेजरला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर हॉटेलमध्ये तोडफोड केल्याने काच, फर्निचर व इतर साहित्याचे मोठे नुकसान झाले. तक्रारीनुसार सुमारे १.२५ लाखांचे नुकसान झाले आहे. तोडफोडीदरम्यान काचा खाली पडल्याने हॉटेलमधील कर्मचारी व ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक सोनाली दिलीप आहिरे पुढील तपास करत आहेत. रेल्वे स्थानकासारख्या वर्दळीच्या परिसरात चॉपर घेऊन हॉटेलमध्ये घुसून धमकी व तोडफोड झाल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## समाजकारण, राजकारणाचा कार्यतपस्वी आधारवड हरपला

**मुंबई :** पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने समाजकारण, राजकारणात भरीव योगदान देणारे आणि या क्षेत्रातील अनेक संस्थांचे आधारवड ठरलेले कार्यतपस्वी नेतृत्व काळाने हिरावून नेले आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार, पश्चिम बंगाल आणि त्रिपुराचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. डॉ. पाटील यांच्या निधनामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाल्याचे फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

डॉ. पाटील यांनी ज्ञानदेव या आपल्या नावाप्रमाणेच ज्ञानाची आराधना केली. शिक्षण क्षेत्रालाच आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. एका छोट्याशा शाळेपासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे. सुमारे २०० संस्था, विविध प्रकारची आठ विद्यापीठे आणि हजारो विद्यार्थी, असा त्यांच्या कार्याचा विस्तार झाला. विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण, आर्किटेक्चर अशा वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि आधुनिक सुविधांच्या उभारणीतून त्यांनी आपल्या शैक्षणिक समुहासोबतच महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावला, असे



सांगत फडणवीस यांनी डॉ. पाटील यांच्या कार्याचा गौरव केला आहे. डॉ. पाटील यांनी आयुष्यभर शिक्षण, सेवा आणि विनम्रतेची मूल्ये जपली. त्यांनी रुजवलेली शिक्षणसेवेची परंपरा, विनम्रतेचा आदर्श आणि समाजहिताची मूल्ये कायम प्रेरणादायी राहतील. त्यांच्या जाण्याने एका दूरदर्शी शिक्षणमहर्षीचा अंत झाला असला, तरी त्यांचे विचार आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. डॉ. डी. वाय. पाटील हे केवळ शिक्षणसंस्था उभारणारे प्रशासक नव्हते. तर समाजपरिवर्तनाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शिक्षणाला नवे क्षितिज देणारे दूरदृष्टीचे शिक्षणमहर्षी होते, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डॉ. पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे. डॉ. पाटील यांनी उभी केलेली शैक्षणिक चळवळ लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारी ठरली. आज डी. वाय. पाटील विद्यापीठातून विविध अभ्यासक्रमांच्या माध्यमातून देश-विदेशातील हजारो विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळत आहे. देशभरात सात स्वतंत्र विद्यापीठांची निर्मिती हा त्यांच्या दूरदृष्टीचा आणि कार्यक्षम नेतृत्वाचा ऐतिहासिक ठेवा असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे.

# मतदारयाद्यांच्या सुधारित एसआयआर कार्यक्रमांतर्गत आता 17 ऑगस्टपर्यंत दाखल करता येतील अर्ज

मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR - Special Intensive Revision) 30 जूनपासून सुरू असून त्या अंतर्गत गणनाअर्ज दाखल करण्याची मुदत 8 ऑगस्टपर्यंत होती. त्यास भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मुदतवाढ जाहीर करण्यात आलेली असून आता मतदार 17 ऑगस्ट 2026 पर्यंत आपले गणनाअर्ज संबंधित मतदार यादी भाग क्रमांकाच्या मतदान केंद्र अधिकारी (BLO) यांचेकडे जमा करू शकतात.

दि. 1 ऑक्टोबर 2026 या पात्रता दिनांकाच्या अनुषंगाने मतदार यादीचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम सुरू असून 30 जूनपासून बीएलओंमार्फत गणनाप्रपत्रे वितरण, संकलन आणि डिजीटलायझेशनचे काम सुरू आहे. या कामास नवीन सुधारणा परिपत्रकान्वये आता 17 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून मतदान केंद्रांचे पुनर्रचनाकरण आणि पुनर्व्यवस्थापन कामही 17 ऑगस्टपर्यंत पूर्ण करावयाचे आहे. महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्यामार्फत एसआयआर कामावर बारकाईने लक्ष दिले जात आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीचे प्रकाशन 24 ऑगस्ट 2026 पर्यंत करावयाचे असून याबाबत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी 24 ऑगस्ट ते 23 सप्टेंबर 2026 असणार आहे तसेच तसेच प्राप्त दावे व हरकतींची नोटीस प्रक्रिया आणि निकाली काढणे कालावधी 24 ऑगस्ट ते 22 ऑक्टोबर 2026 हा असणार आहे. अंतिम मतदार यादी 27 ऑक्टोबर 2026 रोजी प्रकाशित करण्यात येणार आहे.

आजपर्यंत 150 ऐरोली विधानसभा मतदारसंघात 4,97,380 मतदारांपैकी 4,59,153 गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून 2,23,808 गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे माहिती भरून जमा करण्यात आलेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

त्याचप्रमाणे, 151 बेलापूर विधानसभा मतदारसंघातील 4,22,317 मतदारांपैकी 4,10,863 गणनाप्रपत्रांचे वितरण झालेले असून 2,18,028 गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओंकडे आवश्यक माहिती भरून जमा झालेली आहेत व त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झालेले आहे.

यामध्ये सर्वात महत्वाची बाब म्हणजे नागरिकांना गणनापत्रे दाखल करण्यासाठी आता 17 ऑगस्ट 2026 पर्यंतचा कालावधी असून आपली गणनापत्रे बीएलओंकडे माहिती भरून जमा केली नाही तर त्या नागरिकाचे नाव प्रारूप मतदार यादीतून वगळले जाणार आहे.

त्यामुळे नागरिकांनी सन 2002 च्या यादीत आपला वा आपल्या पालकांच्या नावाचा तपशील सापडला नाही तरीही फक्त गणनापत्राच्या कॉलम 3 मध्ये आपली सध्याची माहिती भरून व स्वाक्षरी करून त्यासोबत आयोगाने जाहीर केलेल्या कागदपत्रांपैकी एक कागदपत्र जोडून आपले गणनाप्रपत्र (Enumeration Form) आपल्या भागातील बीएलओ यांच्याकडे जमा करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा आपले नाव प्रारूप यादीतून वगळण्यात येईल व पुन्हा मतदारयादीत नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म 6 सोबत आवश्यक कागदपत्रे सादर करून नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागणार आहे, याची नोंद घ्यावी. नागरिकांच्या सोयीसाठी आपल्या मतदार यादी भाग क्रमांकाचे बीएलओ कोण आहेत याची माहिती 150 ऐरोली करिता https://www.facebook.com/share/p/1DWA4rSkHv/ या लिंकवर

तसेच 151 बेलापूर करिता https://www.facebook.com/share/p/19FVzXaDvf/ या लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तरी आपला मतदानाचा घटनेने दिलेला अधिकार अबाधित राखण्यासाठी गणनाप्रपत्रे गणनापत्र (Enumeration Form) भरून बीएलओंकडे देणे व त्याचे डिजीटलायझेशन होणे आवश्यक असल्याचे लक्षात घेत 17 ऑगस्टपर्यंत न थांबता गणनाप्रपत्र आजच दाखल करावे असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नमुंमपा अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी केले आहे.

# शिवसेना लोकप्रतिनिधींसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर

**प्रमोद कुमार**

**ठाणे :** मीरा भाईंदर जवळील उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे कल्याण - डोंबिवली येथील शिवसेना लोकप्रतिनिधींसाठी आज विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ।लोकप्रतिनिधी हा नगराचा मालक नसतो, तर जनतेचा सेवक असतो, पदाचा अहंकार न ठेवता कार्यकर्ता म्हणून लोकांमध्ये राहा. संपत्तीपेक्षा माणसं कमवा, नागरिकांच्या फोनला प्रतिसाद द्या, त्यांच्या अडचणी स्वतःच्या समजून सोडवा आणि विकासाच्या प्रत्येक निर्णयात पर्यावरणाचा विचार करा. लोकांनी निवडून दिल्यानंतर आपण



त्यांच्या सेवेत रुजू झालो, ही भावना कधीही विसरू नका असे याप्रसंगी नमूद केले.

नगरसेवक म्हणून काम करताना महापालिका अधिनियम, नगरसेवकांचे अधिकार-कर्तव्य, अर्थसंकल्प, सभागृहाचे कामकाज, स्मार्ट सिटी, क्लस्टर डेव्हलपमेंट, पुनर्विकास, विषय समित्या, सोशल मीडिया, नागरिकांच्या तक्रारी, वाहतूक, रिंगरोड, पायाभूत सुविधा आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास प्रत्येक नगरसेवकाने केला पाहिजे अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली. यावेळी शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , माजी खासदार आणि शिवसेना महाराष्ट्र संघटन प्रमुख आनंद परांजपे, आमदार डॉ. बालाजी किणीकर, आमदार राजेश मोरे,आयुक्त अभिनव गोयल, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळ पाटील, जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, महापौर

ॲड. हर्षाली विजय चौधरी - थविल , गटनेते विश्वनाथ राणे, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे सूरज आव्हाड, डॉ.प्रकाश आवाडे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक आणि शिवसैनिक उपस्थित होते ।

# मोतीलाल नगर पुनर्विकास तातडीने सुरू करा; आणखी विलंब नको-रहिवासी संघटनांची मागणी

**मुंबई : सुरेश ढेरे**

सदर पत्रकार परिषद मध्ये आयोजक व इतर मान्यवर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, गोरेगाव (पश्चिम) येथील मोतीलाल नगर क्रमांक १, २ आणि ३ या म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम तातडीने सुरू करण्यात यावे, अशी मागणी मोतीलाल नगर जनकल्याणकारी समिती, मोतीलाल नगर रहिवासी विकास संघ आणि मोतीलाल नगर पुनर्विकास समन्वय समिती यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली.

संघटनांनी सांगितले की, मोतीलाल नगरमधील हजारो कुटुंबे अनेक दशकांपासून जीर्ण, असुरक्षित आणि अपुऱ्या सुविधांच्या घरांमध्ये राहत आहेत. अरुंद रस्ते, वाहतुकीची कोंडी, अस्वच्छ परिसर आणि सुरक्षेच्या समस्यांमुळे रहिवाशांचे जीवन कठीण झाले असून पुनर्विकास हा केवळ बांधकामाचा नव्हे, तर नागरिकांच्या सुरक्षित आणि सन्मानजनक जीवनाचा प्रश्न आहे.

तसेच मोतीलाल नगर ही म्हाडाची अधिकृत वसाहत असून पुनर्विकासाची संपूर्ण प्रक्रिया म्हाडाच्या देखरेखीखाली सुरू आहे. अदानी समूह हा या प्रकल्पाचा विकासक असून सर्व निर्णय




आणि अंमलबजावणी म्हाडाच्या नियम व मार्गदर्शक तत्त्वांनुसारच केली जात आहे. संघटनांच्या मते, डीसीपीआर-२०३४ मधील नियम ३३(९) आणि कलम २.२ अंतर्गत हा विशेष क्लस्टर पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने १७ ऑक्टोबर २०२४ तसेच ६ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आदेशांमुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत आवश्यक कायदेशीर स्पष्टता मिळाली असून पुनर्विकासाला कोणताही कायदेशीर अडथळा उरलेला नाही.

यामुळे आता पुनर्विकासाच्या कामाला आणखी विलंब न लावता तातडीने गती द्यावी, अशी मागणी तीनही रहिवासी संघटनांनी केली आहे.

विकास पुनर्विकासाबाबत रहिवाशांना दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. समित्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि म्हाडा तसेच संबंधित विकास संस्थांशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर मोतीलाल नगरातील पात्र रहिवाशांना १,६०० चौरस फूट कार्पेट क्षेत्रापर्यंतच्या गाळ्यांसाठी १,६०० चौरस फूट कार्पेट क्षेत्राएवढेच स्वामित्वाचे घर देण्यास मान्यता मिळाली आहे. या निर्णयामुळे पात्र रहिवाशांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार असल्याचा विश्वास समित्यांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भातील काही महत्त्वाच्या बाबींवर चर्चा सुरू असून त्यावरही लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

काही मोजक्या स्वार्थी व्यक्तींकडून पुनर्विकासाबाबत चुकीची माहिती पसरवून रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा आणि प्रकल्पात अडथळे आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही पत्रकात करण्यात आला आहे. अशा प्रकारे विकास प्रक्रियेत अडथळे निर्माण करणाऱ्यांविरोधात संबंधित यंत्रणांनी योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी समित्यांनी केली आहे.

समित्यांनी आपली भूमिका पूर्णपणे पक्षनिरपेक्ष असून कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. सर्व निर्णय हे केवळ मोतीलाल नगरातील रहिवाशांच्या हिताचा विचार करूनच घेतले जात असल्याचेही पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

शेवटी, रहिवाशांनी अफवा किंवा दिशाभूल करणाऱ्या प्रचारावर विश्वास न ठेवता केवळ म्हाडा, शासन आणि अधिकृत समित्यांकडून मिळणाऱ्या माहितीलाच महत्त्व द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सर्वांनी एकजूट राखून शांततेच्या मार्गाने आणि परस्परांचा सन्मान ठेवून पुनर्विकास प्रक्रिया यशस्वी करावी, जेणेकरून मोतीलाल नगरातील हजारो कुटुंबांचे सुरक्षित व उज्ज्वल भविष्य लवकरात लवकर साकार होईल, असे सांगण्यात आले. तसेच आमच्या पुनर्विकास मध्ये कुणाचेही राजकारण चालणार नाही.

## Change Of Name

I HAVE CHANGE MY NAME FROM ZAINAB SALEEM KHAN TO ZAINAB SALIM KHAN AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGE MY NAME FROM SALEEM KHAN TO SALIM MUMTAZ KHAN AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGE MY NAME FROM RIZWANA SALEEM KHAN TO RIZWANABEGUM SALIM KHAN AS PER DOUCMENTS.

I HAVE CHANGE MY NAME FROM SHABINA TO SABINA AASIM SHARIF AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMED FARUKH MOHAMMED SHAFIQUE TO MOHD FARUKH MOHD SHAFIK SIDDIQUI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM RAJIUNNISA FARUKH MOHAMMED FARUKH TO RAJIBUNNISHA MOHD FARUKH SIDDIQUE AS PER DOCUMENTS

I AM CHANGING MY NAME FROM ASHOKLAL GANUMAL RAMWANI TO ASHOK GANUMAL RAMWANI FOR PASSPORT ISSUANCE

I AM CHANGING MY NAME FROM ASHOKLAL GANUMAL RAMVANI TO ASHOK GANUMAL RAMWANI FOR PASSPORT ISSUANCE

I AM CHANGING MY NAME FROM HEMA ASHOKLAL |RAMVANI TO DIKSHA NARENDRA TARWANI FOR PASSPORT ISSUANCE

## Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM PALLAVI AJIT ANERAO TO PALLAVI VIJAYKUMAR BHOSALE AS PER AFFIDAVIT DATED .22/07/2026 ADDRESS :FLAT O.102,DHARMA TOWER, SECTOR-9, AIROLI, NAVI MUMBAI-400708

I HAVE CHANGED MY NAME FROM AKASH SHARADKUMAR MISHRA TO AKASH SHARAD MISHRA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM NISHAD AFRIN / NISHAD AFRIN AHMED SIDDIQUI TO NISHAT AFRIN SIDDIQUI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SHARADKUMAR MISHRA / SHARAD MISHRA / SHARAD KUMAR S MISHRA TO SHARAD KUMAR SHRINATH MISHRA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM FIRDOUS JAHAN TO FIRDOS ABDUL SANNE SHAIKH AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM : HAMIDA ABDUL HALEEM TO HAMIDA HUMAID KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SAYED SANA BEGUM MUMTAZ TO SANA IRSHAD KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MUMTAZ SAYYED TO MUMTAZUL HAQUE INAMUL HAQUE SAYED AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MAHENDRA RAUT TO MAHENDRA VISHWANATH RAUT AS PER DOCUMENTS

## Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM RAMJAN QUREESHI TO MOHAMMED RAMZAN QURESHI AS PER DOCUMENTS, FOR ALL FUTURE PURPOSES

I AM CHANGING MY NAME FROM ABDUL RAUB TO ABDUL RAUF MOHAMMED KHAN FOR PASSPORT ISSUANCE AS PER DOCUMENTS

I AM CHANGING MY NAME FROM UMESH HARI KAMBLE TO UMESH HARI SAMBODHI FOR PASSPORT ISSUANCE AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMAD AZHAR JALIL MOMIN (OLD NAME ) TO MOHAMMAD AZHAR ABDUL JALIL MOMIN ( NEW NAME ) AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAZIYA BANO TO ANSARI SHAZIYA BANO AFTAB AHMED AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SHAIKH AREEB MOHAMMAD NAFEES TO SHAIKH AREEB MOHD NAFEES AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM YOOSUF HUSAIN MANDAWARIYA TO YUSUF HUSAIN GULAM HUSAIN MANDAWARIYA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MADINA TO MADINA BEGAM YUSUF MANDAWARIYA AS PER DOCUMENTS

## Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM MOHAMMAD DANISH SAMSAD KHAN TO MOHD DANISH SAMSAD KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM KAMLESHBHAI LALJIBHAI JETHVA TO KAMLESH LALJIBHAI JETHVA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM MAHARSHI KAMLESHBHAI JETHVA TO MAHARSHI KAMLESH JETHVA AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM ABDUL SATTAR MOHAMED JABIR ANSARI TO ABDUL SATTAR MOHD JABIR ANSARI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM JAMALUDDIN MOHAMMAD QAYYUM MANIYAR TO JAMALUDDIN MOHD QAYYUM MANIYAR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SAJJAD KHAN TO MOHD SAJJAD SULEMAN KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM ABIBA ABDUL SATTAR ANSARI TO ADEEBA ABDUL SATTAR ANSARI AS PER DOCUMENTS

I AM CHANGING MY NAME FROM SHER ALI SHER KHAN TO KHAN SHER ALI SHER KHAN AS PER DOUCMENTS.

I AM CHANGING MY NAME FROM SHER ALI SHER KHAN TO KHAN SHER ALI SHER KHAN AS PER DOUCMENTS.

## Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM SEETALAXMI NARAYAN WARRIER TO SEETHALAKSMI HARI WARRIER AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM RESHMA HIRALAL BHAGWANI TO PRERNA VIJAY HARGUNANI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM VIJAY RAMESHKUMAR HARGUNANI TO VIJAY RAMESH HARGUNANI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM TRISHAL PARTAB HOTCHANDANI TO TRISHAL PRATAP HOTCHANDANI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM PAYAL TO PAYAL DASHARATH CHAWAN AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM FARID ISMAIL MEMON TO FARID ISMAIL KAPADIYA AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM RAHILA NISAR AHMED GUDEKAR TO RAHILA MOSIM BHERI AS PER DOCUMENTS.

I HAVE CHANGED MY NAME FROM MAHEK SIKANDAR PASHA TO MAHEK KALAAM KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM ALFIYA FIRDOUS SHE NASIR TAMBOLI TO ALFIYA NASIR SHAIKH AS PER GAZETTE NO. N-2646489

## Change Of Name

I HAVE CHANGED MY NAME FROM KHAN AMIR TUFAIL AHMED TO AMIR TUFAIL KHAN AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGE MY NAME FROM MARYAM MANNAN JANJIRKAR TO MARYAM ABDUL MANNAN JANJIRKAR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGE MY NAME FROM KALOKHE MOHAMMED SHAKIR TO KALOKHE MOHAMMAD SHAKIR AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM GHAISAS MANDAR VINAYAK TO MANDAR VINAYAK GHAISAS AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM RAFIKHBHAI AJITBHAI MODI TO RAFIK AJIJBHAI MODI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM VIJAY LAXMI MOHAN TO VIJAYALAXMI MOHAN GUJARATHI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM SULTANA BEGUM FAROOQUE QURESHI TO SULTANA FAROOQUE QURESHI AS PER DOCUMENTS

I HAVE CHANGED MY NAME FROM HEMANT WAMAN MALI TO HEMANT VAMAN MALI AS PER DOCUMENTS

I AM CHANGING MY NAME FROM PRAKASH SINGH NEGI DEVCHAND SINGH NEGI TO PRAKASH SINGH NEGI AS PER DOCUMENTS

# ठाणे महापालिकेच्या नऊ प्रभाग समित्यांवर अखेर अध्यक्ष विराजमान

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या नऊ प्रभाग समितींच्या अध्यक्षपदासाठीची निवडणूक आज महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पार पडली. या निवडणुकीसाठी ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी पीठासीन अधिकारी म्हणून काम पाहिले. यावेळी महापालिका सचिव मनीष जोशी उपस्थित होते. या निवडणुकीत 8 जणांची बिनविरोध निवड झाली असून मुंब्रा प्रभागसमिती अध्यक्षपदासाठी निवडणूक पार पडली. या निवडणुकीत दिपाली भगत विजयी झाल्या.




यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, आमदार रविंद्र फाटक, आमदार राजेश मोरे, पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व नवनिर्वाचित प्रभाग समिती अध्यक्षांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. वागळे प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी एकता एकनाथ भोईर, लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी निर्मला कणसे, नौपाडा-कोपरी प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी मिनल मुकुंद संख्ये, वर्तकनगर प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी जयश्री जेरी डेविड (गायकर), माजीवडा-मानपाडा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी सिद्धार्थ दिलीप ओवळेकर, उथळसर प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी नारायण शंकर पवार, कळवा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी विजया मनोज लासे आणि दिवा प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी दीपक नामदेव जाधव यांची बिनविरोध निवड झाली.

मुंब्रा प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी मात्र चुरशीची लढत झाली. ऑल इंडिया मजलीस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) पक्षाचे अन्सारी नफीस अहमद मोहम्मद अनीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) यांच्या दिपाली मोतीराम भगत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या दोन्ही उमेदवारांमध्ये झालेल्या मतदानात अन्सारी यांना 4 मते, तर दिपाली भगत यांना 10 मते मिळाली. त्यामुळे पीठासीन अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिपाली भगत यांना विजयी घोषित केले.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदावर पदोन्नती



**ठाणे :** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (पुरुष) या पदावरील ११ कर्मचाऱ्यांना आरोग्य सहाय्यक (पुरुष) पदावर पदोन्नती देऊन समुपदेशनानंतर पदस्थापना आदेशांचे वितरण आज, दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा परिषद सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, ₹अधिक जबाबदारीने सेवा करण्याची संधी आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण, तत्पर आणि संवेदनशील आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येकाने आपल्या नव्या पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी. शासनाच्या विविध आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवेला अधिक सक्षम बनविण्यासाठी सर्वांनी समर्पित भावनेने कार्य करावे. पदोन्नती प्राप्त कर्मचाऱ्यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त करत जिल्हा परिषद प्रशासनाचे आभार मानले. नव्या जबाबदारीचे भान ठेवून ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उद्घाटन

**उरण: सुनिल ठाकूर**

यू बिझनेस मिट आणि संलग्न संस्थांच्या वतीने नुकतेच नवी मुंबई ग्लोबल समिट चे आयोजन करण्यात आले होते. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर यू बिझनेस मिट यांच्यावतीने इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर चे उद्घाटन सोमवार दिनांक ३ ऑगस्ट रोजी बेलापूर येथील बी आर एस सी सी एल येथे करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रारंभ करण्यात आलेल्या संकल्पनेने मूर्त रूप धारण केले असून हे उद्घाटन म्हणजे या संकल्पनेची पुढली पायरी मानली जात आहे. यू बिझनेस मिट चे संस्थापक वैभव सोनटक्के यांनी आपले सहकारी समृद्धी वाणी, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे आणि संलग्न संस्थांचे प्रमुख यांच्या उपस्थितीत इंडो-थाई बिझनेस कॉरिडोर ची निर्मिती केली आहे. एक्सपोर्ट इम्पोर्ट, मेडिकल टुरिझम, रिअल इस्टेट, ग्लोबल मिडिया, एंटरटेनमेंट इंडस्ट्री, मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री, क्लाऊड एंटरप्रेनरशिप, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, बँकिंग अँड फायनान्स, कन्स्ट्रक्शन अशा नानाविध क्षेत्रातील होतकरू आणि विजिगीशू वृत्तीच्या व्यावसायिकांना थायलंड देशाबरोबर व्यवसाय करण्याकरता हे कॉरिडोर अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे असे वैभव सोनटक्के यांनी सांगितले.तसेच आगामी काळात मॉरिशस, दुबई आणि अमेरिका या देशांच्या समवेत क्रॉस बाउंड्री व्यवसाय करण्याकरता यू बिझनेस मीट पंख पसरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

इंटरनॅशनल बिझनेस कॉरिडोरचे उद्घाटन करत असतानाच यु बिझनेस मीट यांच्यावतीने कॉर्पोरेट बिझनेस सेंटर देखील सुरू करण्यात आले आहे. व्यवसाय संधी शोधणाऱ्या होतकरूंना अल्प शुल्कात कार्यालय या उपक्रमांतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय व्यवसाय करत असणाऱ्या होतकरूंना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाताना लीगल ॲडव्हाइस, सरकारी परवाने, आंतरराष्ट्रीय व्यवसाय करार आदी



महत्त्वपूर्ण दस्तावेज बनवण्याकरता यु बिझनेस मिटने पुढाकार घेतला आहे.

या उद्घाटन सोहळ्याला निष्णात मानसोपचारतज्ञ आणि सेक्सोलॉजिस्ट डॉ राहुल भातांबरे,डॉ प्रियांका आशिष, सौंदर्य तज्ञ आणि फीजिओथेरपीस्ट,सेन्सिबल कनेक्ट सोल्युशन्स चे सर्वेसर्वा अमृत नेरळीकर,तेरणा हॉस्पिटलचे जनरल मॅनेजर डॉक्टर मनीष राय, यू बिझनेस मिट प्रतिनिधी केतकी पटवर्धन,जान्हवी पाटील,आय डी एफ सी बँकेचे पब्लिक रिलेशन्स आणि कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स प्रतिनिधी.यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महिलांच्या कलागुणांसाठी पारंपारिक मंगळागौर स्पर्धेचे आयोजन

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांकरिता महिला मेळाव्याचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. त्या अनुषंगाने महिलांकरिता मंगळागौर स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत जे महिला समुह सहभाग घेऊ इच्छितात त्यांनी आपले अर्ज दि. 15 ऑगस्ट 2026 पर्यत आपल्या कार्यक्षेत्रातील विभाग कार्यालय तसेच उपआयुक्त, समाजविकास विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर भवन, पहिला मजला, से. 11, सी.बी.डी. बेलापूर येथे कार्यालयीन सुट्टी वगळता जमा करावेत असे आवाहन महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीम.सलुजा सुतार यांच्या वतीने करण्यात येत आहे.



या स्पर्धेची प्राथमिक फेरी दि. 20 ऑगस्ट 2026 रोजी, सकाळी 9 वाजल्यापासून महात्मा फुले स्मृती भवन, भूखंड क्र.12/13, तिसरा मजला, सेक्टर -3, वाशी नवी मुंबई येथे संपन्न होणार आहे. याविषयीची माहिती अर्ज दाखल करणा-या स्पर्धकांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. या व्यतिरीक्त नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला गटांकरिता गटांच्या माध्यमातून सक्षक्तीकरण या विषयाबाबत तज्ज्ञ व्यक्तींमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

ही मंगळागौर स्पर्धा फक्त महिलांसाठी खुली राहील. प्रत्येक संघामध्ये किमान 10 आणि कमाल 15 महिला सदस्य सहभागी असाव्यात. एका महिलेला एकाच समुहातूनच सहभागी होता येईल. तसेच स्पर्धेकरिता महिलांनी अंतिम तारखेपूर्वी सहभाग नोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धेमध्ये मंगळागौर सादरीकरणाचा कालावधी कमीत कमी 8 मिनीटे ते जास्तीत जास्त 10 मिनिटे असेल. महिला समुहाने वेळेची मर्यादा ओलांडल्यास गुण वजा केले जातील याची नोंद घ्यावयाची आहे. महिला समुहाने सादरीकरणामध्ये मंगळागौरीची पारंपारिक संस्कृती, लोकनृत्य व पारंपारिक खेळांचे दर्शन होणे अपेक्षित आहे. जो संघ सादरीकरणामध्ये झिम्मा, फुगडी, गोफ, टिपऱ्या इत्यादी पारंपरिक घटकांचा योग्य वापर करेल त्या संघाला प्राधान्य दिले जाईल. मंगळागौर सादरीकरणामध्ये पारंपरिकता आणि नाविन्य यांचा सुंदर समतोल असावा.

मंगळागौर स्पर्धेचे परीक्षण करताना पारंपारिकता व संस्कृतीचे सादरीकरण, नृत्य कौशल्य व तालबद्धता, झिम्मा / फुगडी / गोफ इत्यादींची अचूकता, सर्जनशीलता व नृत्यरचना, अभिनय व भावभावना, वेशभूषा व एकसंधता, संघातील समन्वय तसेच मंचावरील वावर आणि एकूण सादरीकरण अशा घटकांचा गुणांकनात विचार करण्यात येईल. मंगळागौरीकरिता संगीत / ट्रॅक स्पर्धकांनी स्वतः उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे. संगीताची ऑडिओ फाईल स्पर्धेपूर्वी आयोजकांकडे जमा करणे आवश्यक आहे. संगीतामध्ये अश्लील, आक्षेपार्ह किंवा सांस्कृतिक मूल्यांना बाधा आणणारे शब्द/दृश्य नसावेत. स्पर्धक समुहाची वेशभूषा महाराष्ट्रीयन पारंपरिक पद्धतीची असणे अपेक्षित आहे. समुहास नऊवारी / पारंपारिक साडी, नथ, गजरा, पारंपरिक दागिने यांचा योग्य वापर करता येईल. स्पर्धक समुहाची वेशभूषा सादरीकरणाच्या विषयाला अनुरूप आणि सुसंस्कृत असावी.

स्पर्धक समुहाला आवश्यकता असल्यास पारंपारिक साहित्याचा वापर करता येईल. वापरण्यात येणारे साहित्य सुरक्षित व स्टेजसाठी योग्य असावे. ज्यामुळे स्टेजला नुकसान होईल किंवा इतर स्पर्धकांना धोका निर्माण होईल असे साहित्य वापरण्यास परवानगी नसेल. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिलांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्यासाठी मंगळागौर यासारख्या पारंपारिक प्रकारातील स्पर्धा आयोजित करण्यात आली असून यामध्ये महिला मंडळे, संस्था, समुह, गट यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महापौर श्रीम.सुजाता सुरज पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## जाहीर नोटीस

**कल्याण येथील मा. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) कल्याण यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी दावा नं. ७/२०२६**

**श्री. दत्तात्रय गजानन पाटील**
वय - ७२ वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. १७, मनुप्रसाद, शिवमंदिर रोड, संगितावाडी, डोंबिवली (पू.), ठाणे .....**वादी**

**विरूध्द**

**श्री. विनायक नारायण गांगड**
वय - ५५ वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. गाळा नं. ४, विनायक जनरल स्टोअर्स, तळमजला, अनिकेत बिल्डींग, शिवमंदीर रोड, संगितावाडी, डोंबिवली (पू.), ता. कल्याण, जि. ठाणे. ...... **प्रतिवादी**

या जाहिर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, सदरहु दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द भाडे नियंत्रण कायदा १९९९ चे कलम १५,१६ (जी), (एन) प्रमाणे दाखल केलेला आहे. सदरहु दाव्यात प्रतिवादी हे दाव्यात नमुद केलेल्या पत्त्यावरील गाळा बरेच वर्षापासुन बंद असल्यामुळे मे. कोर्टाने निशाणी ६ वर आदेश करून प्रतिवादीयांना दिवाणी प्रकिया सहिंतेचे कम ५ नियम २० (१-अ) अन्वये बजावणी करण्याचा आदेश केलेला आहे.

सबब नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर दाव्यामध्ये पुर्नसुनावणीची तारीख दि. १३/०७/२०२६ अशी नेमण्यात आलेली आहे. सदर दिवशी प्रतिवादी यांनी प्रत्यक्ष अथवा वकिलासह हजर व्हावे, अन्यथा दाव्याची सुनावणी एकतफी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी. वरील मुदतीत प्रत्यक्ष अथवा वकिलासह हजर न झाल्यास वादी यांचे विनंती प्रमाणे दाव्याची सुनावणी एकतफी चालविण्यात येईल. आज दि.१/०७/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिली असे.

हुकुमावरुन
सही/- लिपिक (कोर्टाचा शिक्का)
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) कल्याण

## जाहीर नोटीस

**उल्हासनगर येथिल मे. दिवाणी न्यायाधिश क स्तर यांचे न्यायालयात उल्हासनगर**

**दिवाणी अर्ज क्र. ४९/ २०२६** **नि. ५**

**श्रीमती वंदना सोपान घोडेस्वार** ....**अर्जदार**

**विरूध्द**

**निरंक** ...**सामनेवाले**

वरिल नमुद अर्जदार ही मुलगी असुन मयत नामे कै. अनुसया सोपान घोडेस्वार यांचा मृत्यु दिनांक १६/०६/२०२४ रोजी झाला असुन वरिल अर्जदार यांनी या न्यायालयात कायदेशीर वारस दाखला मिळवण्याकरीता अर्ज केला असुन सदर अर्जदार यांना कायदेशीर वारस दाखला देणेबाबत हरकत असल्यास सदरहु नोटीस प्रसिध्दी झालेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अथवा वकिलामार्फत लेखी पुराव्यानिशी दाखल करावे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांची विनंती वरून वारस दाखला देण्यात येईल यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. आज दिनांक ५/८/२०२६ रोजी माझ्या सहि निशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

हुकुमावरुन
सही/- लिपिक (कोर्टाचा शिक्का)
सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय उल्हासनगर

## PUBLIC NOTICE

Shri / Smt Manohar Shankar Wadnerkar a Member of the Amrut Co-operative Housing Society Ltd having address at Badlapur (E), Mumbai and holding Banglow No.14 in the building of the society Missing on 11/01/1999 without making any nomination.

The society hereby invites claims or objections from the heir or heirs or other claimants / objector or objectors to the transfer of the said shares and interest of the missing member in the capital/property of the society within a period of 15 days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for transfer of shares and interest of the missing member in the capital/property of the society. If no claims/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal with the shares and interest of the missing member in the capital/ property of the society in such manner as is provided under the bye-laws of the society. The claims/objections, if any, received by the society for transfer of shares and interest of the missing member in the capital/property of the society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection by the claimants/ objectors, in the office of the society/with the Secretary of the society from the date of publication of the notice till the date of expiry of its period.

Place: Badlapur (East)
Date: 06/08/2026

For and on behalf of
Sd/- Sd/- Sd/-
**Chairman | Secretary | Treasurer**
**For AMRUT CO-OP. HSG.**

## जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, दिवंगत श्री. एम. एच. रवींद्रन (यापुढे “सदरहू मयत” असे संबोधण्यात येईल) यांनी त्यांच्या हयातीत गायत्री धाम फेज-१ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, हनुमान मंदिर समोर, गणेश मंदिर रोड, मांडा-टिटवाळा (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१६०५ येथील बिल्डिंग क्र. सी-४, तिसरा मजला, सदनिका क्र. १३, क्षेत्रफळ ५०५ चौ. फूट (बिल्ट-अप) ही सदनिका दि. १८/०८/१९९२ रोजीच्या नोंदणीकृत विक्री करारनाम्याद्वारे (Agreement for Sale), दस्त क्र. छा. ४२२९/१९९२ अन्वये खरेदी केली होती. सदर करारनामा हा सह दुय्यम निबंधक, कल्याण- १ यांच्या कार्यालयात विधिपूर्वक नोंदणीकृत आहे. सदरहू मयत यांचे दि. १०/०२/२०२३ रोजी पल्स हॉस्पिटल, कल्याण येथे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांची पत्नी श्रीमती यशोदा रविंद्रन, या माझ्या पक्षकार असून त्या सदर सदनिकेत वास्तव्यास आहेत व सदर सदनिकेच्या कायदेशीर वारस व ताबेदार आहेत. यापुढे असेही जाहीर करण्यात येते की, सदर सदनिकेचे दुरुस्ती/नूतनीकरणाचे काम सुरू असताना वर नमूद केलेल्या मूळ विक्री करारनाम्याची प्रत गहाळ झाली आहे. माझ्या पक्षकारांनी सदर मूळ दस्तऐवजाचा सर्वतोपरी व कसून शोध घेतला; तथापि तो मिळून आलेला नाही. त्यामुळे माझ्या पक्षकारांनी सदर मूळ दस्तऐवज हरविल्याबाबत Lost Item Report in Thane Rural या ऑनलाईन पोर्टलवर रजिस्टर आयडी HSk7QBXaXL, दि. ०२/०८/२०२६ रोजी नोंदविली आहे.

यास्तव, कोणाही व्यक्तीला वर नमूद करारनाम्याची मूळ प्रत सापडली असेल किंवा सदरहू करारनामा व सदनिकेसंबंधी हितसंबंध-हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याचे १४ दिवसांत खालील नमूद कार्यालयात सदर करारनामा मूळ प्रत सादर करावी किंवा हरकत नमूद करावी. विहित मुदतीत मूळ करारनामा अथवा हरकत दाखल न केल्यास माझे पक्षकार सदरहू करारनाम्याची ड्युपलिकेट प्रत दुय्यम निबंधक कार्यालयातून प्राप्त करून भविष्यात सदरहू सदनिकेसंबंधी विक्री, गहाणखत, बक्षीस पत्र, हक्कसोड पत्र, मृत्यूपत्राबाबत दस्त नोंदणी व इतर योग्य ती कायदेशीर तजवीज करतील करतील व या बाबतीत कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि. ०३/०८/२०२६
ठिकाण : टिटवाळा, कल्याण

पत्ता : बी-०२, तळ मजला, रवींद्र हाईट्स, नांदप रोड, सावरकर नगर, मांडा- टिटवाळा (पूर्व), ता. कल्याण. जि. ठाणे, महाराष्ट्र - ४२१६०५
मो. नो. : +९१ ८९८३१०५८९७
ई-मेल:- rusheekeshwalanj3210@gmail.com

सही/-
**ॲड. ऋषीकेश जे. वाळंज**

## जाहीर नोटीस

या नोटीसीद्वारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, सदनिका नं. १०१, पहीला मजला, ओम साई ज्योत को. ऑ.हौ.सो.लि., भारत माता शाळेजवळ, जुनी डोंबिवली, डोंबिवली (पश्चिम) ४२१२०२, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, क्षेत्र ७७६ चौ. फुट विल्ट अप ही सदनिका गोविंद एकनाथ महाजन यांचे नावावर आहे. परंतु कै. गोविंद एकनाथ महाजन यांचे दिनांक १९.०६.२०१८ रोजी डोंबिवली येथे निधन झाले आहे. तसेच त्यांची पत्नी कै. विजया गोविंद महाजन यांचे दिनांक २४.०९.२०२४ रोजी भुसावळ, जळगाव येथे निधन झाले आहे. कै. गोविंद एकनाथ महाजन आणि कै. विजया गोविंद महाजन यांचे पश्चात त्यांचा मुलगा कैलास गोविंद महाजन आणि त्यांची मुलगी सौ. दिपाली हर्षल नेमाडे (लग्नाआधीचे कुमारी प्रतिमा गोविंद महाजन) ही त्यांची मुले सदरच्या मालमत्तेचे कायदेशीर वारसदार आहेत. सदरच्या मालमत्तेसंबंधात कोणचाही वारसाहक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिदध झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत सदरच्या पत्त्यावर त्यांचे ना हकरत कागदपत्रांसह लेखी स्वरूपात दाखल करावे. अन्यथा जर कोणीही मुदतीमध्ये हरकत न घेतल्यास सदरहु मालमत्तेसंबंधात कोणाचीही तकार किंवा हरकत नाही असे समजुन वरीलप्रमाणे कायदेशीर वारसदार हे सदरहु मालमत्तेसंबंधात योग्य ते व्यवहार पुर्ण करतील. मात्र त्यानंतर येणा-या कोणत्याही तकारीची किंवा हरकतीची दखल घेतली जाणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

पत्ता-शॉप नं. ४, तळमजला, सिंधुसागर सोसायटी, महात्मा फुले रोड, विष्णुनगर, डोंबिवली पश्चिम .

**सही/-**
**सौ. सानिका अ. नारकर**
ॲडव्होकेट

## PUBLIC NOTICE

**IN THE HON’BLE COURT OF C.J.S.D KALYAN. AT KALYAN HON’BLE RATOD MADAM.**

**CIVIL M.A NO: 785/2026.** **Exhibit No: 05**

**MRS. SUDHA VIJAYAN PILLAI.**
Adult, Indian Inhabitant, Occupation - Housewife.
R/at: 16, Vithal Apartment, Tisgaon Road, Kalyan East, Dist. Thane, Maharashtra-,
Mob No: 8097834138. .....**Applicant.**

**VIS.**

**1)MR. ANKUSH VIJAYAN PILLAI.**
Adult, Indian inhabitant, Occupation- Service,
R/at: 16, Vithal Apartment, Tisgaon Road, Kalyan East, Dist. Thane Maharashtra-, Mob No: 9969554144.

**2)MR.AKHILESH VIJAYAN PILLAI.**
Adult, Indian inhabitant, Occupation-Service,
R/at.16, Vithal Apartment, Tisgaon Road, Kalyan East, Dist. Thane, Maharashtra.

WHEREAS the above named Applicant has filed Civil M.A before this Hon’ble court for Legal Heirship Certificate of the SUIT FLAT.

ALL the persons concern having any claim or objection in this regard are given notice to appear in the court of Civil Judge Senior Division Kalyan before Hob’ble Judge RATOD MADAM at KALYAN WEST, in person or by pleader on 21/09/2026 duly instructed within the period of 30 days from the date of publication of this notice. Failing which the said application will be heard ex-parte and appropriate Order may be passed.

GIVEN UNDER MY HAND SEAL ON THIS

Sd/-
Jr.CLERK (court seal)

**by Order**
**Sd/-**
Asst. Superintendent
Civil Court, S.D. Kalyan

**Adv. Vaishali Kapure**

## PUBLIC NOTICE

**IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D), KALYAN AT KALYAN**

**M.A. No. 350/2022** **Exh. No 19**

**Mr. Siddesh Bhau Walunj**
R/at-Flat No- No-002 on Ground floor, Building no. 10 A Nilgiri-Lodhara
Malang road, Kalyan East ......**Applicant**

**V/s**

**1.Smt. Lahanbai Bhau Walunj**
Having address at - Flat No- No-002 on Ground floor, Building no. 10 A Nilgiri-Lodhara. Off Haji Malang road, Kalyan East
**2. Mr. Swapnil Bhau Walunj**
**3. Mr. Sagar Bhau Walunj**
Opp no. 2 &3, Having address at-A/1, BMC Quarters, Anushakti Nagar, Mumbai-94 ..........**Opponents**

Whereas the Applicant and Opponent No-2 and 3 are sons of deceased Late Bhau Janardhan Walunj and Opponent No-2, is the wife of Late Bhau Janardhan Walunj, who Died on 2nd December 2021 at Mumbai. The Applicant and Opponents are the only heirs of the deceased Bhau Janardhan Walunj. The Applicant has applied for grant of heirship certificate in respect of the property of deceased Bhau Janardhan Walunj. The said property is describes as follows:

**SCHEDULE OF THE PROPERTY**

All that premises of Flat No- 002 on Ground floor, in building no. 10 A, total admeasuring 444 Sq. ft area in building known as ‘Nilgiri-Lokdhara’ registered in the office of Sub-Registrar of Assurance, Kalyan, Village Tis, Taluka Kalyan, Dist Thane within the limits of Kalyan Dombivli Municipal Corporation, along with share certificate bearing, no. 48 for 5 shares of Rs. 50/- each bearing distinctive nos. from 236 to 240 (both inclusive).

Bank account bearing No-159301000006005 with Indian Overseas Bank, Lok Gram Branch, Kalyan east standing in the name of which is standing in the name of the deceased.

If any person is having any claim against into or upon the aforesaid property or otherwise howsoever are hereby required to notify the same in writing along with the supporting documentary evidence within 30 days from the date of publication of this notice. Failing which the application shall be granted in favour of the applicants as prayed for.

Given under my hand and seal of this court on dated

Jr. Clerk (court seal)

**by Order**
**Sd/-**
Asst. Superintendent
Civil Court, S.D. Kalyan

# मोलबायो डायग्नॉस्टिक्सचा आयपीओ १० ऑगस्ट २०२६ रोजी खुला होणार

**मुंबई, सचिन मुरडेश्वरः**
टेमासेक आणि मोतीलाल ओसवाल समूह यांच्या पाठबळ असलेल्या मोलबायो डायग्नॉस्टिक्सने आपल्या ९३०.७ कोटींच्या प्रारंभिक समभाग विक्रीचा (IPO) किंमतपट्टा प्रति समभाग ७६८ ते ८०७ निश्चित केला आहे. हा सार्वजनिक इश्यू १० ऑगस्ट रोजी गुंतवणुकीसाठी खुला होणार असून १२ ऑगस्ट रोजी बंद होईल. तर अँकर गुंतवणूकदारांसाठीचा इश्यू ७ ऑगस्ट रोजी खुला करण्यात येणार आहे. गुंतवणूकदारांना किमान १८ इक्विटी समभागांसाठी अर्ज करता येणार असून त्यानंतर त्याच्या पटीत बोली लावता येईल. किंमतपट्ट्याच्या उच्च स्तरावर या आयपीओचे मूल्य ९३०.७ कोटी इतके आहे. या इश्यूमध्ये २०० कोटींच्या नव्या समभागांचा समावेश असून, विद्यमान भागधारकांकडून ९१.६६ लाख समभागांची ऑफर फॉर सेल (OFS) करण्यात येणार आहे.

हा आयपीओ ३,०६७ कोटींच्या धूत ट्रान्समिशनच्या सार्वजनिक इश्यूबरोबरच १० ऑगस्ट रोजी खुला होणार असून त्या दिवशी मुख्य बाजारातील दोन प्रमुख आयपीओंपैकी एक असेल. ऑफर फॉर सेलमध्ये प्रवर्तक एक्सोरा ट्रेडिंग, डॉ. चंद्रशेखर भास्करण नायर, गुंतवणूकदार इंडिया बिझनेस एक्सलन्स फंड आणि अन्य सात भागधारक समभाग विक्री करणार आहेत. या इश्यूनंतर प्रवर्तकांचा हिस्सा सध्याच्या ४६.६५ टक्क्यांवरून कमी होणार असून उर्वरित ५३.३५ टक्के हिस्सा टेमासेक होल्डिंग्स समर्थित व्ही सायन्सेस इन्व्हेस्टमेंट्स आणि मोतीलाल ओसवाल समूहाच्या इंडिया बिझनेस एक्सलन्स फंडसह इतर गुंतवणूकदारांकडे राहील. गोवा-स्थित मोलबायो डायग्नॉस्टिक्स ही पॉइंट-ऑफ-केअर (POC) निदान उपाय विकसित करणारी कंपनी आहे. कंपनीचे प्रमुख ट्रूनॅट प्लॅटफॉर्म १०० हून अधिक देशांमध्ये पेटंट संरक्षित असून त्याद्वारे क्षयरोग (टीबी), कोविड-१९, हिपॅटायटिस बी आणि सी, ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस (एचआयव्ही) आणि ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) यांसारख्या आजारांची जलद आण्विक चाचणी करता येते. पीसीआर-आधारित हे प्लॅटफॉर्म विशेषतः मर्यादित संसाधने असलेल्या भागांमध्ये एका तासाच्या आत निदान अहवाल उपलब्ध करून देण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. कंपनी नव्या समभाग विक्रीतून मिळणाऱ्या निधीपैकी १०५.५ कोटींचा वापर तिची पूर्ण मालकीची उपकंपनी बिगटेकमार्फत संशोधन व विकास (R&D) केंद्र तसेच सेंटर ऑफ एक्सलन्स आणि कार्यालयीन पायाभूत सुविधा उभारण्यासाठी करणार आहे. आणखी ७२.२ कोटी गोवा आणि विशाखापट्टणम येथील उत्पादन प्रकल्पांसाठी यंत्रसामग्री आणि उपकरणे खरेदी करण्यासाठी वापरले जाणार असून उर्वरित निधी सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरला जाईल. आयपीओच्या सादरीकरणावेळी श्रीराम नटराजन (कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी), डॉ. चंद्रशेखर भास्करण नायर (कार्यकारी संचालक व मुख्य तंत्रज्ञान अधिकारी), मनन बिमल खोखाणी (अध्यक्ष – वित्त व लेखा आणि मुख्य वित्तीय अधिकारी), शिवा श्रीराम (अध्यक्ष – व्यवसाय विकास) आणि इंद्रनील बोरकाकोटी (अध्यक्ष – कॉर्पोरेट धोरण, विलीनीकरण व अधिग्रहण आणि गुंतवणूकदार संबंध) उपस्थित होते.



आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मोलबायो डायग्नॉस्टिक्सने दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली असून निव्वळ नफा १४.८ टक्क्यांनी वाढून १६६.६ कोटींवर पोहोचला, तर महसूल ४१.७ टक्क्यांनी वाढून १,४४५.७ कोटी झाला.

या इश्याचे बुक-रनिंग लीड मॅनेजर्स म्हणून कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी, आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस आणि जेफरीज इंडिया काम पाहत आहेत. समभाग वाटपाचा आधार १३ ऑगस्ट रोजी निश्चित होण्याची अपेक्षा असून कंपनीचे समभाग १७ ऑगस्ट रोजी शेअर बाजारात सूचीबद्ध होण्याची शक्यता आहे.

# इम्पॅक्ट स्टोरी : झाडे कोसळण्याच्या बातम्यांची दखल; केडीएमसीकडून तज्ज्ञ समितीची स्थापना

**श्रीकांत खुपेरकर**
**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (केडीएमसी) हद्दीत झाडे कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चालू पावसाळ्यात डोंबिवली एमआयडीसी परिसरात सुमारे १५ झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या असून, त्यामध्ये वाहने, इमारतींच्या संरक्षक भिंती तसेच इतर मालमत्तेचे नुकसान झाले आहे. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनांबाबत दैनिक न्यूज हब इंग्लिश आणि मराठी मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची दखल घेत केडीएमसीच्या उद्यान विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मुख्य उद्यान अधीक्षक श्री. संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये डॉ. श्रेया भानप, उमेश मुंडल्ये, रुपाली शाईवाले, अविनाश पाटील आणि महेश देशपांडे यांचा समावेश असून, त्यांनी कोसळलेल्या झाडांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आहे.



एमआयडीसी निवासीमध्ये एकाच दिवशी दोन ठिकाणी झाडे कोसळली

श्रीकांत खुपेरकर
डोंबिवली : एमआयडीसी निवासी परिसरात झाडे कोसळण्याचे सत्र सुरूच असून आज (सोमवारी) सकाळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी मोठी झाडे कोसळल्याने वाहने आणि संरक्षक भिंतीचे नुकसान झाले. मात्र दोन्ही घटनांमध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. पहिली घटना सुदर्शन नगर येथील ओम अगत्य सोसायटी (RX-16/17) आवारात घडली. येथे औदुंबराचे मोठे झाड कोसळून दोन चारचाकी वाहनांचे नुकसान झाले. घटनेच्या वेळी परिसरात कोणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून झाड हटविले. ही माहिती ओम अगत्य सोसायटीचे सचिव श्री. सोमा नायर यांनी दिली. दुसरी घटना माणिक रत्न सोसायटी (RH-121) आवारात घडली. येथील आंब्याचे मोठे झाड कोसळून ते शेजारील शिवाई बालक मंदिर शाळेच्या मैदानात पडले. या घटनेत शाळा आणि सोसायटीच्या संरक्षक भिंतीचे नुकसान झाले. झाड पडले तेव्हा विद्यार्थी त्या ठिकाणी नसल्याने मोठी दुर्घटना टळली. अग्निशमन

आतापर्यंत झाडे कोसळल्यामुळे वाहने, संरक्षक भिंती आणि इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. भविष्यात अशाच घटनांमध्ये जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तसेच अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्यांची नियमित छाटणी,

झाडे कोसळण्यामागील कारणांचा अभ्यास करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत समिती सविस्तर अहवाल तयार करणार आहे. हा अहवाल केडीएमसी आयुक्तांना सादर करण्यात येणार असून, त्यानंतर आवश्यक कार्यवाही व उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती आहे. उशीरा का होईना, केडीएमसीने या गंभीर विषयाची दखल घेत तज्ज्ञ समितीची स्थापना केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या कार्यवाहीसाठी केडीएमसी उद्यान विभाग तसेच हा विषय सातत्याने मांडणाऱ्या दैनिक न्यूज हब इंग्लिश आणि मराठी यांचे मनःपूर्वक आभार.

# कल्याण-डोंबिवलीत स्वाइन फ्लूचे दोन रुग्ण

**श्रीकांत खुपेरकर**
**कल्याण :**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (KDMC) हद्दीतील एका खासगी रुग्णालयात स्वाइन फ्लू (H1N1) चे दोन रुग्ण आढळून आले आहेत. दोघांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले असून ते वैद्यकीय सल्ल्यानुसार विश्रांती घेत आहेत.

महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, स्वाइन फ्लू हा विषाणूजन्य संसर्गजन्य आजार असून खोकताना किंवा शिंकताना बाहेर पडणाऱ्या थेंबांद्वारे त्याचा प्रसार होतो. या आजाराची प्रमुख लक्षणे म्हणजे तीव्र ताप, खोकला, सर्दी, घसा दुखणे, अंगदुखी आणि अशक्तपणा. अशी लक्षणे आढळल्यास नागरिकांनी स्वतः औषधोपचार न करता रुक्मिणीबाई रुग्णालय, शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय किंवा महापालिकेच्या जवळच्या आरोग्य केंद्रात त्वरित तपासणी करून उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी वारंवार हात धुणे, खोकताना किंवा शिंकताना रुमाल किंवा टिश्यूचा वापर करणे, संतुलित आहार घेणे, पुरेसे पाणी पिणे, गर्दीच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मास्क वापरणे आणि आजारी असल्यास अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, असेही महापालिकेने म्हटले आहे. महापालिकेने स्वाइन फ्लू प्रतिबंधासाठी आवश्यक सर्व उपाययोजना सुरू असून परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचा विश्वास नागरिकांना दिला आहे.

# कलम ३७० रद्द होऊन सात वर्षे पूर्ण; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीरच्या परिवर्तनाचे केले कौतुक

**मुंबई, सचिन मुरडेश्वरः**
भारताने बुधवारी कलम ३७० रद्द होऊन सात वर्षे पूर्ण झाल्याचा दिवस साजरा करत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या विकासासाठी तसेच तेथील नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केंद्र सरकारची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, गेल्या सात वर्षांत या दोन्ही केंद्रशासित प्रदेशांमध्ये विविध क्षेत्रांत लक्षणीय परिवर्तन झाले आहे.

५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने राष्ट्रपती आदेशाद्वारे तत्कालीन जम्मू-काश्मीर राज्याचा विशेष दर्जा रद्द करून कलम ३७० निष्प्रभ केले होते. यासोबतच राज्याला विशेष स्वायत्तता देणाऱ्या घटनात्मक तरतुदींचा अंत झाला.

एक्सवरील आपल्या संदेशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले, "आजच्या दिवशी सात वर्षांपूर्वी कलम ३७० आणि कलम ३५(अ) इतिहासजमा झाले. जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या प्रवासात हा एक निर्णायक नवा अध्याय ठरला."

ते पुढे म्हणाले, "तेव्हापासून जम्मू-काश्मीर आणि लडाखमधील नागरिकांच्या जीवनात व्यापक बदल झाले आहेत. पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर विकसित झाल्या असून शिक्षण, आरोग्य, उद्योजकता आणि क्रीडा क्षेत्रात नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. महिला तसेच वंचित घटकांना, ज्यांना अनेक दशकांपासून घटनात्मक हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते, भारतीय राज्यघटनेची संपूर्ण अंमलबजावणी झाल्यामुळे आता सशक्तीकरण मिळाले आहे."

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, यंदाचा ५ ऑगस्ट हा दिवस आणखी



विशेष आहे, कारण याच वर्षी भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती साजरी केली जाणार आहे.

"राष्ट्रीय एकात्मतेसाठी त्यांचे आजीवन योगदान आजही अनेक पिढ्यांना प्रेरणा देत आहे. त्यांनी अनेक दशकांपूर्वी पाहिलेले स्वप्न ५ ऑगस्ट २०१९ रोजी ऐतिहासिकरीत्या साकार झाले," असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, "जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या प्रगतीसाठी तसेच प्रत्येक नागरिकाला मोठी स्वप्ने पाहण्याची, ती पूर्ण करण्याची आणि विकसित भारताच्या निर्मितीत योगदान देण्याची संधी मिळावी, यासाठी आमची वचनबद्धता कायम आहे."

कलम ३७० हे १९५० मध्ये भारतीय राज्यघटना लागू झाल्यानंतर त्याचा भाग बनले होते. तत्कालीन जम्मू-काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारी ही घटनात्मक तरतूद दीर्घकाळ वादग्रस्त राहिली. ५ ऑगस्ट २०१९ रोजी हे कलम निष्प्रभ करण्यात आले आणि जम्मू-काश्मीरचे पुनर्गठन करून जम्मू-काश्मीर आणि लडाख हे दोन स्वतंत्र केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले. यामुळे राज्याचा पूर्वीचा विशेष घटनात्मक दर्जा समाप्त झाला.

# बांधकामाचा राडारोडा उघड्यावर टाकणा-यांवर कारवाई; केडीएमसीचा इशारा

**श्रीकांत खुपेरकर**
**कल्याण :** बांधकाम, दुरुस्ती किंवा पाडकामातून निर्माण होणारा राडारोडा उघड्यावर टाकणाऱ्या व्यक्ती व संस्थांविरुद्ध बांधकाम व पाडकाम (C&D) कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिला आहे.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, नवीन बांधकाम, दुरुस्ती किंवा पाडकाम करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थेने निर्माण होणारा कचरा सुरक्षितपणे गोळा करून अधिकृत केंद्रात स्वतःच्या खर्चाने पोहोचवणे बंधनकारक आहे. या नियमांचा उद्देश कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर आणि शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे हा आहे. गृहनिर्माण संस्थांच्या आवारात कोणतेही बांधकाम, दुरुस्ती किंवा पाडकाम सुरू करण्यापूर्वी संबंधितांनी आपल्या प्रभागातील स्वच्छता अधिकारी किंवा स्वच्छता निरीक्षक यांना माहिती द्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. त्यामुळे कचरा व्यवस्थापनाबाबत योग्य मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकणार आहे. महापालिकेला पूर्वकल्पना न देता बांधकामाचा कचरा उघड्यावर टाकल्याचे आढळल्यास संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ च्या कलम १५ तसेच बांधकाम व पाडकाम (C&D) कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांनी सांगितले की, या संदर्भातील परिपत्रक सर्व गृहनिर्माण संस्थांना पाठविण्यात येत असून नियमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे.

# मुंबई प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी सुरेंद्र गांगण; पॉलिटिकल फोटो जर्नालिस्ट असोसिएशनकडून अभिनंदन, फोटो जर्नालिस्टांच्या मागण्यांचे निवेदन सुपूर्द

**मुंबई : सचिन मुरडेश्वरः**
मुंबई प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी झालेल्या निवडीबद्दल पॉलिटिकल फोटो जर्नालिस्ट् असोसिएशन तर्फे नवनियुक्त अध्यक्ष श्री सुरेंद्र गांगण यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी पॉलिटिकल फोटो जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेश जाधव, खजिनदार दत्ता खेडेकर, प्रेस क्लबचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुरेंद्र गांगण , सचिव अनिल सिंह, उपाध्यक्ष पांडुरंग म्हस्के, मॅनेजिंग कमिटी सदस्य आदित्य दुबे , मनीषा रेगे, उमेश गोस्वामी, आणि आणि पॉलिटिकल फोटो जर्नालिस्ट असोसिएशनचे सचिव तथा प्रेस क्लबचे नवनिर्वाचित मॅनेजिंग कमिटी सदस्य स्वप्निल शिंदे यांची विशेष उपस्थिती होती.



त्याचबरोबर फोटो जर्नालिस्ट अरविंद खरात, महेश पोळ,संदीप पागडे, सचिन वैद्य, देबाशीश डे, इम्तियाज शेख ,सलमान अन्सारी,संदीप टक्के, अर्जुन कांबळे, विजय गोहिल, गणेश शिरसेकर, अंशुमन पोयरेकर, शैलेश जाधव,अमित भोसले, कुणाल कासार सुद्धा उपस्थित होते

पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ अनुभव, दूरदृष्टी आणि प्रभावी नेतृत्वाच्या बळावर मुंबई प्रेस क्लब अधिक सक्षम, प्रगतिशील आणि पत्रकारहिताचे कार्य करणारी संस्था म्हणून अधिक उंची गाठेल, असा आम्हाला विश्वास असून छायाचित्र पत्रकार (फोटो जर्नालिस्ट ) हे समाजापर्यंत घटनांचे वास्तव चित्र पोहोचविणारे महत्त्वाचे घटक आहेत.

त्यांच्या व्यावसायिक अडचणी, सुरक्षितता, अत्याधुनिक तांत्रिक सुविधा, प्रशिक्षण, विमा, कल्याणकारी योजना आणि प्रेस क्लबमधील योग्य प्रतिनिधित्व या दीर्घकालीन मागण्यांकडे आपल्या नेतृत्वाखाली सकारात्मक दृष्टीने पाहिले जाईल, अशी आम्हाला अपेक्षा असून आपल्या नेतृत्वाखाली सर्व पत्रकार आणि छायाचित्र पत्रकार ( फोटो जर्नालिस्ट)यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास याप्रसंगी आपल्या छोटी खाणी भाषणात स्वप्निल शिंदे यांनी व्यक्त केला . आणि संस्थेच्या मागणी तथा अध्यक्षांचे अभिनंदनाचे पत्र अध्यक्षांना देण्यात आले.

# उत्तनमध्ये शिवसेना लोकप्रतिनिधी प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**श्रीकांत खुपेरकर**
**उत्तन :** मीरा-भाईंदरजवळील उत्तन येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे कल्याण-डोंबिवलीतील शिवसेना लोकप्रतिनिधींसाठी आयोजित विशेष प्रशिक्षण शिबिराचा समारोप उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झाला.



यावेळी मार्गदर्शन करताना शिंदे म्हणाले की, लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक असतो. पदाचा अहंकार न बाळगता नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करावे. विकास करताना पर्यावरणाचा विचार करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरसेवकांनी महापालिका अधिनियम, अर्थसंकल्प, स्मार्ट सिटी, पुनर्विकास, पायाभूत सुविधा, सोशल मीडिया आणि शाश्वत विकास यांचा अभ्यास करून प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच प्रशासनाशी समन्वय ठेवून शहराच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेण्याचे आवाहन केले. याच कार्यक्रमात २००३ मध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी लावलेल्या नारळाच्या वृक्षाशेजारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वृक्षारोपण केले. या प्रसंगाला शिवसेनेच्या प्रवासाचे आणि नेतृत्वाच्या सातत्याचे प्रतीक मानले गेले.

# 'जीवनदान'च्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीला नवी दिशा, राजोल संजय पाटील यांच्या पुढाकार

**मुंबई :अजय उपाध्याय**
समाजात अवयवदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करून अधिकाधिक नागरिकांनी या महान कार्यात सहभागी व्हावे, या उद्देशाने वांद्रे येथे आयोजित करण्यात आलेल्या अवयवदान जनजागृती कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला चित्रपट अभिनेते आमिर खान, उद्योगपती डॉ. निरंजन हिरानंदानी, आर. डी. अँड एस. एच. नॅशनल कॉलेजच्या प्राचार्या डॉ. नेहा जगतियानी, सहर भामला यांच्यासह 'जीवनदान' संस्थेच्या संस्थापिका तथा नगरसेविका राजोल संजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

स्व. दिना बामा पाटील प्रतिष्ठान, जीवनदान संस्था, भामला फाऊंडेशन व आर. डी. नॅशनल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून अवयवदानाचे सामाजिक महत्त्व आणि त्याबाबतची जनजागृती वाढविण्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. अवयवदान ही केवळ वैद्यकीय गरज नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. आजही समाजात अवयवदानाबाबत अनेक गैरसमज आणि माहितीचा अभाव असल्याने अशा जनजागृती उपक्रमांची आवश्यकता अधिक असल्याचे मान्यवरांनी सांगितले. जीवनदान' संस्थेच्या माध्यमातून राजोल संजय पाटील यांनी अवयवदान व नेत्रदानाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभारले आहे. त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे ३ हजारांहून अधिक डोळ्यांचे दान घडवून आणण्यात आले असून त्यामुळे अनेक अंध व्यक्तींना नव्याने दृष्टी मिळाली आहे. समाजसेवेच्या या कार्यामुळे 'जीवनदान' संस्था अवयवदान जनजागृतीच्या क्षेत्रात विश्वासार्ह नाव म्हणून ओळख निर्माण करत आहे.




याचबरोबर स्व.दिना बामा पाटील प्रतिष्ठान सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या विविध उपक्रमांद्वारे सातत्याने समाजकार्यात योगदान देत आहे. ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या या प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक ग्रंथालये चालविण्यात येत असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, शैक्षणिक मदत तसेच विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिष्ठानचे कार्य मोलाचे मानले जाते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अवयवदानाचा संकल्प करण्याचे आवाहन करताना, प्रत्येक नागरिकाने या चळवळीत सहभागी होण्याची गरज व्यक्त केली. एक अवयवदाता किमान आठ जणांचे प्राण वाचवू शकतो. त्यामुळे अवयवदान हा जीवनदानाचा सर्वात मोठा संदेश आहे, असे प्रतिपादन राजोल संजय पाटील यांनी केले. या उपक्रमामुळे अवयवदानाबाबत समाजात सकारात्मक विचार निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या जनजागृती अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# केडीएमसीच्या मोहनेमध्ये मुद्दत गेलेल्या औषधांचा ढीग मेडिकल

**प्रमोद कुमार**
**कल्याण :** कल्याण जवळील आंबिवली मधील मोहने परिसरातील यादव नगर स्मशानभूमीजवळ उल्हास नदीकाठी तारीख संपलेल्या औषधांचा ढीग आढळून आला आहे त्यामुळे नदी किनाऱ्याच्या आणि परिसराच्या स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मोहने मधील यादव नगर मिनी डम्पिंग ग्राउंड होतो की काय अशी भीती नागरिकांना आणि ग्रामस्थांना भेडसावत आहे . अ प्रभाग कार्यालयाच्या हद्दीत असणाऱ्या आंबिवली मधील मोहने परिसरात यादव नगर स्मशान भूमी बाजूला मोठ्या प्रमाणात मेडिकल वेस्टची उघड्यावर विल्हेवाट लावण्या ऐवजी रस्त्याच्या बाजूला मेडिकल्स कचरा टाकण्यात आला आहे. सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांच्या निदर्शनास आणून दिले होते मात्र एस आय आर कामात अधिकारी आणि कर्मचारी वर्ग कामात गुंतल्याने काही प्रमाणात दुर्लक्ष होत असल्याची कबुली दिली आहे। दरम्यानकल्याणमध्ये मेडिकल वेस्टचा गंभीर प्रश्न! पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही अशी भीती नागरिकाना, ग्रामस्थांना भेडसावत आहे । घनकचरा विभागाने करोडो रुपये मेडिकल वेस्ट विल्हेवाट लावण्यासाठी केला जातो या बाबीकडे लक्ष देईल अशी आशा नागरिक व्यक्त करत आहे

संपादकिय

# आव्हान समान ऊर्जावाटपाचे

आज भारताकडे ऊर्जा क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षमता आहे; मात्र देशातील प्रत्येक घर, शेत, शाळा आणि रुग्णालयाला समान गुणवत्तेची वीज मिळेल तेव्हाच त्या नेतृत्वाला खरी प्रतिष्ठा मिळेल. ऊर्जा सुरक्षा हा प्रवासाचा पहिला टप्पा होता. आता ऊर्जा न्याय हेच भारताच्या विकासाचे पुढील ध्येय असले पाहिजे. कारण विजेचा प्रकाश केवळ बल्ब नाही, तर समाजातील संधी, समानता आणि विकासाची नवी दिशा उजळवतो.

भारताने गेल्या दशकभरात ऊर्जा क्षेत्रात केलेली प्रगती जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. एके काळी वीजटंचाई, भारनियमन आणि अपुऱ्या उत्पादनामुळे ओळखला जाणारा भारत आज जगातील सर्वाधिक वेगाने ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. कोळशावर आधारित प्रकल्पांबरोबरच सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. देशाची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता दुपटीहून अधिक वाढली आहे. राष्ट्रीय वीजग्रीडची क्षमता विस्तारली आहे. नवीकरणीय ऊर्जेतील भारताची झेप जागतिक पातळीवर कौतुकास्पद मानली जात आहे; मात्र या सर्व यशामागे एक मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे, तो म्हणजे देशात पुरेशी वीज निर्माण होत असली, तरी प्रत्येक नागरिकापर्यंत समान गुणवत्तेने पोहोचते का? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहे. कारण ऊर्जा म्हणजे केवळ उद्योगधंद्यांचे इंधन नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सन्मानपूर्वक जगण्याचा पाया आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाधोरणाचा पुढील टप्पा केवळ 'ऊर्जा सुरक्षा' नसून 'ऊर्जा न्याय' असला पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण विद्युतीकरणाला गती मिळाली. घराघरांमध्ये वीज जोडणी देण्याची मोहीम राबवण्यात आली.(Solar-powered) विशेष भर देण्यात आला. आज देशाची एकूण वीजनिर्मिती क्षमता ५२० गीगावॉटपेक्षा अधिक झाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनाव्यतिरिक्तच्या स्रोतांमधून उपलब्ध होत आहे.

भारताने हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या जागतिक चर्चेत भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे; मात्र राष्ट्रीय पातळीवरील ही प्रगती प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक घरात सारखीच अनुभवाला येते, असे म्हणता येणार नाही. अनेक दुर्गम आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि सीमावर्ती गावे आजही खंडित वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. शहरात रोहित्र बिघडल्यास काही तासांमध्ये दुरुस्ती होते; परंतु ग्रामीण भागात अनेकदा दोन-दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहतो. शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रभर जागून पाणी द्यावे लागते. अनेक गावांमध्ये कमी दाबामुळे मोटारी चालत नाहीत. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. देशात शंभर टक्के घरांना वीजजोडणी मिळाल्याचा दावा केला जातो; परंतु मीटर बसवणे आणि चोवीस तास दर्जेदार वीज मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक घरांमध्ये जोडणी आहे; पण अनियमित पुरवठा, कमी व्होल्टेज किंवा वारंवार होणाऱ्या खंडित सेवेमुळे त्या जोडणीचा अपेक्षित फायदा होत नाही. ऊर्जा न्याय म्हणजे केवळ वीज उपलब्ध असणे नव्हे, तर ती विश्वासार्ह, सुरक्षित आणि परवडणारी असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

ऊर्जा क्षेत्रातील दुसरी मोठी समस्या म्हणजे वितरण व्यवस्थेतील विषमता. महानगरांमध्ये खासगी वितरण कंपन्यांमुळे ग्राहक सेवा, ऑनलाइन बिलिंग आणि तक्रार निवारणामध्ये सुधारणा झाली आहे; परंतु ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये अजूनही जुन्या तारांचे जाळे, अपुरी उपकेंद्रे, कमी क्षमतेची रोहित्रे आणि देखभालीचा अभाव ही वास्तवस्थिती आहे. परिणामी, राष्ट्रीय स्तरावर उत्पादन वाढले असले, तरी वितरणातील कमतरतेमुळे अंतिम ग्राहकाला त्याचा पूर्ण लाभ मिळत नाही. वीजवितरण कंपन्यांच्या आर्थिक सुधारणांवर गेल्या काही वर्षांमध्ये विशेष भर देण्यात आला आहे. तांत्रिक आणि व्यापारी तोटे(Technical and commercial disadvantages) कमी झाले आहेत. अनेक कंपन्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे; परंतु कोणत्याही वितरण कंपनीचे यश तिच्या नफ्यावर मोजता येत नाही. तिचे खरे यश गरीब, शेतकरी, लघुउद्योजक आणि दुर्गम भागातील नागरिकांना सातत्यपूर्ण वीज उपलब्ध करून देण्यात आहे. आर्थिक सुधारणा झाल्या आणि सेवा निकृष्टच राहिली, तर त्या सुधारणांचा सामान्य नागरिकाला काय उपयोग? वीज वितरणामध्ये राजकीय हस्तक्षेप ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक राज्यांमध्ये वीजदर हे आर्थिक वास्तवापेक्षा राजकीय समीकरणांवर ठरतात. मोफत वीज, अनुदाने आणि थकबाकीमुळे वितरण कंपन्यांवर आर्थिक ताण वाढतो. सरकारकडून अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्यास पायाभूत सुविधांच्या देखभालीवर परिणाम होतो. परिणामी ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात आर्थिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल आवश्यक आहे.

आज भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. उद्योग, डेटा सेंटर, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहने आणि डिजिटल सेवा यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा वेळी उपलब्ध वीज प्रथम कोणाला द्यावी, असा प्रश्न निर्माण होतो. मोठ्या उद्योगांना वीज आधी द्यावी की ग्रामीण रुग्णालयांना, औद्योगिक कॉरिडॉरना की सिंचन प्रकल्पांना असे प्रश्न उभे राहतात. हा केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर सामाजिक न्यायाचाही प्रश्न आहे. उद्योगांना वीज मिळाली तर उत्पादन वाढेल, रोजगार निर्माण होतील आणि महसूल वाढेल हा युक्तिवाद योग्य आहे; पण दुसरीकडे ग्रामीण दवाखान्यात वीज नसल्यामुळे शस्त्रक्रिया थांबत असतील, विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नसेल किंवा शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळत नसेल तर विकासाचे चित्र अपूर्ण राहते. म्हणूनच ऊर्जा धोरणाने आर्थिक वाढ आणि सामाजिक समता या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधला पाहिजे. भारताने सौरऊर्जेच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि इतर राज्यांमध्ये मोठे सौरऊर्जा प्रकल्प उभे राहत आहेत. छतावरील सौरऊर्जा, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा साठवणूक यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी उपलब्ध आहेत; मात्र या हरित क्रांतीचा लाभ फक्त मोठ्या कंपन्या आणि शहरी भागांपुरता मर्यादित राहिल्यास ऊर्जा क्षेत्रातील जुन्या विषमता कायम राहतील. भविष्यातील ऊर्जा धोरणात विकेंद्रित ऊर्जा व्यवस्थेला अधिक महत्त्व द्यावे लागेल. गावागावांमध्ये सौर मायक्रोग्रिड, कृषी सौरपंप, स्थानिक ऊर्जा साठवणूक आणि स्मार्ट वितरण व्यवस्था विकसित करावी लागेल. त्यामुळे केवळ राष्ट्रीय ग्रिडवरचा ताण कमी होणार नाही, तर दुर्गम भाग अधिक आत्मनिर्भरही होतील.

# प्रश्न 'आंदोलनजीवी' राजकारणाचा

'ई-२०' इंधनाच्या मुद्द्यावरून केजरीवालांनी काल दिल्लीत पुन्हा आंदोलनाच्या नव्या नाट्याचा प्रयोग करुन पाहिला. केंद्र सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली 'ई-२०'चा निर्णय घेतल्याचा खोटा दावा करत, थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानावर मोर्चा नेण्याचा फुटकळ प्रयत्न त्यांनी केला. मात्र, भारताच्या 'इथेनॉल मिश्रण' कार्यक्रमाचा दोन दशकांहून अधिक काळाचा इतिहास पाहता, हा आरोप तथ्यांच्या कसोटीवर टिकत नाही. दिल्लीतील सत्ता हातातून गेल्यानंतर आणि पंजाबची आगामी निवडणूक डोळ्यांसमोर असताना, केजरीवालांची या आंदोलनामागील राजकीय गणितेही लपून राहत नाही.

आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल आणि आंदोलनाचे राजकारण यांचे नाते तसे जुनेच. एखाद्या धोरणातील त्रुटींवर तथ्याधारित चर्चा करण्याऐवजी त्याला राजकीय संघर्षाचे स्वरूप देऊन स्वतःची पोळी भाजून घेण्यात केजरीवालांचा हातखंडाच. आताही 'ई-२०' म्हणजे २० टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलच्या मुद्द्यावरून त्यांनी दिल्लीत नवा राजकीय आखाडा उभा केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दबावाखाली पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'ई-२०'चा निर्णय घेतला आणि अमेरिकेतील टाकाऊ इथेनॉल भारतात आणले जात आहे, असा आरोप त्यांनी केला. याच आरोपाच्या आधारे कार्यकर्त्यांसह पंतप्रधानांच्या निवासस्थानाकडे मोर्चा नेण्याचा प्रयत्न झाला. धोरणावर प्रश्न विचारणे, हा लोकशाहीत अधिकार आहेच. मात्र, तथ्यांऐवजी संशय आणि भीतीच्या आधारे वातावरण तापवणे, ही जबाबदार विरोधी राजकारणाची पद्धत ठरू शकत नाही.

'ई-२०' बाबत केजरीवाल आणि त्यांचा पक्ष जे चित्र उभे करत आहेत, त्याची तथ्यांच्या आधारे चिकित्सा होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रणाचे धोरण देशाची ऊर्जासुरक्षा मजबूत करण्यासाठी, कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत इथेनॉल उत्पादनाला चालना देण्यासाठी राबविले आहे. ऊस, मका आणि अन्य कृषी उत्पादनांपासून देशात इथेनॉलची निर्मिती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यामुळे आयातीत खनिज इंधनावर खर्च होणाऱ्या परकीय चलनात बचत होण्याबरोबरच देशांतर्गत कृषी अर्थव्यवस्थेलाही नवी बाजारपेठ उपलब्ध झाली. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, भारतातील इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रम हा आज किंवा काल सुरू झालेला नाही. त्याची सुरुवात २००१ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर झाली. २००६ मध्ये 'ई-५' म्हणजे पाच टक्के इथेनॉलमिश्रित पेट्रोलचा वापर सुरू झाला. त्यानंतर मिश्रणाचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आले. म्हणजेच, भारताचा 'ई-२०'कडे जाणारा प्रवास सध्याच्या अमेरिकी व्यापार धोरणापेक्षा कितीतरी जुना आहे. मग दोन दशकांपासून




विकसित होत आलेल्या भारतीय जैव-इंधन धोरणाचा संबंध अचानक ट्रम्प यांच्या दबावाशी कसा जोडता येईल, याचे उत्तर केजरीवालांनी द्यायला हवे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत एकदा 'आंदोलनजीवी' असा मार्मिक शब्दप्रयोग केला होता. कोणताही प्रश्न असो, त्यावर विधायक पर्याय देण्यापेक्षा आंदोलनाच्या माध्यमातून राजकीय वातावरण तापवणे ज्यांच्या राजकारणाचा स्थायीभाव बनतो, त्यांच्यासाठी हा शब्द अगदी चपखल ठरतो. केजरीवालांच्या राजकीय प्रवासातही आंदोलनाला कायमच मध्यवर्ती स्थान राहिले आहे. मग अगदी ते सत्तेत असले तरी! अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून त्यांचा राजकीय उदय झाला. पुढे मुख्यमंत्री झाल्यानंतरही धरणे, मोर्चे आणि केंद्राशी संघर्ष याच शैलीचा त्यांनी वारंवार आधार घेतला. दिल्लीतील सत्ता गेल्यानंतर पुन्हा त्याच परिचित मार्गाने राजकीय प्रासंगिकता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याचे 'ई-२०'च्या आंदोलनातून दिसते. अलीकडच्या काळातील विरोधी राजकारणातही अशीच एक पद्धत सातत्याने समोर येत आहे. एखाद्या वर्गात असंतोष निर्माण झाला की, त्याच्या रास्त प्रश्नांची संस्थात्मक सोडवणूक करण्याऐवजी त्या असंतोषाला व्यापक सरकारविरोधी संघर्षाचे स्वरूप दिले जाते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून राहुल गांधी आणि अन्य विरोधी नेत्यांनी केलेले आरोप असोत किंवा आता 'ई-२०'वरून केजरीवालांनी उभा केलेला संघर्ष असो, प्रत्येक मुद्द्याला मोदीविरोधी राजकीय कथानकात बसवण्याचा प्रयत्न दिसतो. आंदोलनातून राजकीय वातावरण तापवण्याच्या पद्धतीतील साम्य दुर्लक्षित करता येत नाही.

केजरीवालांच्या या आक्रमकतेचा पंजाबमधील आगामी राजकीय लढाईशी असलेला संबंधही विचारात घ्यावा लागेल. पंजाबमध्ये भगवंत मान या नामधारी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात सध्या आम आदमी पार्टीची सत्ता आहे आणि पुढील विधानसभा निवडणूक पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. कायदा-सुव्यवस्था, अमली पदार्थांची समस्या आणि खलिस्तानी कारवायांबाबत विरोधकांकडून पंजाब सरकारला सातत्याने लक्ष्य केले जात आहे. अशा स्थितीत केंद्र सरकारविरोधात संघर्षाचे नवे कारण निर्माण करणे आम आदमी पार्टीसाठी राजकीयदृष्ट्या सोयीचे ठरू शकते. 'ई-२०'सारखा थेट वाहनधारक, शेतकरी आणि मध्यमवर्गाशी संबंधित विषय त्यासाठी अधिक उपयुक्त ठरतो. त्यामुळे या आंदोलनाची वेळ आणि त्याला देण्यात आलेले नाट्यमय स्वरूप पंजाबमधील आगामी राजकीय गणितापासून पूर्णपणे वेगळे करून पाहता येणार नाही. मात्र, 'ई-२०'ला विरोध करताना केजरीवालांनी देशासमोर व्यवहार्य पर्यायही ठेवायला हवा. भारताचे कच्च्या तेलावरील आयात अवलंबित्व कमी करण्याचा त्यांचा मार्ग कोणता? देशांतर्गत इथेनॉल उत्पादनामुळे शेतकऱ्यांसाठी निर्माण झालेल्या बाजाराचे काय करायचे? जैव-इंधन धोरणाला त्यांच्याकडे कोणता पर्याय आहे? त्यामुळे विरोधी पक्षाने सरकारला प्रश्न विचारतानाच, स्वतःची उत्तरेही देशासमोर ठेवली पाहिजेत. विरोध म्हणजे प्रत्येक गोष्टीला नकार नव्हे; व्यवहार्य पर्याय मांडणे हीदेखील विरोधी पक्षाची जबाबदारी आहे.

भारताला सक्षम आणि अभ्यासू विरोधी पक्षांची आवश्यकता आहेच. सरकारच्या प्रत्येक निर्णयाला होकार देणारा विरोधी पक्ष लोकशाहीसाठी उपयोगाचा नाही; परंतु प्रत्येक निर्णयावर रस्त्यावर उतरणे, हाच विरोध समजणारा पक्षही लोकशाहीला बळ देत नाही. आंदोलन हे राजकारणाचे एक साधन असू शकते; राजकारणाचा कायमस्वरूपी पर्याय नाही. केजरीवालांची राजकीय ओळख आंदोलनातून निर्माण झाली. मात्र, आंदोलनातून जन्माला आलेल्या पक्षाने सत्तेचा दीर्घ अनुभव घेतल्यानंतर तरी आंदोलन आणि प्रशासन यांतील फरक समजून घेणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. त्यात आता केजरीवालांनी 'ई-२०'चा मुद्दा पेटवल्यानंतर लगोलग त्यांचा चेला असलेल्या अभिजित दीपकेनेही या आंदोलनात उडी घेण्याचा इशारा दिला. त्यामुळे 'सीजेपी'च्या आंदोलनावेळी 'आधी तू आंदोलन कर, मी समर्थन देतो' अशी केजरीवालांनी भूमिका घेतली आणि आता केजरीवालांच्या समर्थनार्थ दीपकेनेही आंदोलनात उडी घेण्याबाबत तत्परता दाखविली. त्यामुळे एक आंदोलन यशस्वी झाल्यानंतर लगोलग दुसरे आंदोलन पेटवायचे आणि त्यातून पुन्हा अराजकाची परिस्थिती देशात निर्माण करायची, हीच या आंदोलनजीवींची रणनीती!

# तरुणाईच्या आंदोलनाला मिळालेले यश

या देशातल्या तरुणाईने हे दाखवून दिलं की सत्ता कितीही ताकदवान असली, तरी एकवटलेल्या जनतेसमोर तिला झुकावंच लागतं आणि या लढ्यात ठाकरे बंधूंनी दाखवलेली एकजूट, त्यांनी तरुणाईच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहणं, हे महाराष्ट्राच्या राजकारणासाठी एक नवा अध्याय ठरू शकतो.

तेहतीस दिवस. तेहतीस दिवस एका सरकारने आपल्याच देशातल्या तरुण पिढीविरुद्ध हरतऱ्हेने शक्तीचा वापर केला आणि तरीही ही पिढी मागे हटली नाही, हे या देशाच्या लोकशाहीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवण्यासारखं आहे. दिल्ली मेट्रोची सोळा स्थानकं बंद करण्यात आली, राजीव चौक आणि जनपथसारख्या मध्यवर्ती ठिकाणी प्रवाशांना ना आत जाता येत होतं ना बाहेर पडता येत होतं. मध्य दिल्लीतली इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली. जेणेकरून आंदोलकांना एकमेकांशी संपर्क साधताच येऊ नये. तरीही जंतरमंतरवरचा जमाव कमी झाला नाही, उलट दिवसागणिक वाढतच गेला. एका बाजूला राज्ययंत्रणेची सारी हत्यारं लाठी, अश्रुधूर, निषेधाज्ञा, दळणवळण खंडित करणं आणि दुसऱ्या बाजूला फक्त हातात तिरंगा आणि आपल्या भवितव्याची चिंता घेऊन उभी राहिलेली एक पिढी. अखेर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आणि या तेहतीस दिवसांच्या संघर्षाला यश मिळालं.

बारा वर्षांच्या भाजप राजवटीत एकाही मंत्र्याने आपल्या अपयशाची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिल्याचं उदाहरण दुर्मीळ आहे. रेल्वे अपघातांपासून ते सीमेवरच्या घुसखोरीपर्यंत, प्रत्येक वेळी जबाबदारी झटकण्याची, चौकशी समित्या नेमून वेळ मारून नेण्याची परंपरा या राजवटीने जपली आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या एका उत्स्फूर्त, कुठल्याही पक्षाच्या झेंड्याखाली न जमलेल्या आंदोलनाने एका केंद्रीय मंत्र्याला पायउतार व्हायला भाग पाडणं, ही केवळ राजकीय घटना नाही, तर हे सिद्ध करणारी घटना आहे की सत्तेपुढे तरुणाईचा एकवटलेला



आवाज टिकून राहिला, तर सत्तेलाच झुकावं लागतं आणि या यशाचं श्रेय एकट्या दिल्लीतल्या आंदोलकांचं नाही. मुंबईनेही आपला वाटा उचलला. शिवाजी पार्क, चेंबूर, पवई, जुहू अशा ठिकाणी हजारो तरुण रस्त्यावर उतरले आणि दिल्लीतल्या लाठीहल्ल्याचा निषेध नोंदवला. वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली. पण या साऱ्या आंदोलनाला खरी धार आली ती राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन बंधूंनी एकाच व्यासपीठावर येऊन या तरुणाईच्या पाठीशी उभं राहिल्यानंतर. दादरमध्ये छत्रपती शिवाजी पार्कसमोर अमित ठाकरे आणि आदित्य ठाकरे आंदोलनात सामील झाले आणि दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. हे दृश्य महाराष्ट्राच्या राजकारणासाठी विलक्षण होतं. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर रविवारी, २६ जुलै रोजी मुंबईत ठाकरे बंधूंनी शिवाजी पार्क येथे विजय साजरा केला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी स्पष्टपणे सांगितलं की देशातल्या अंधभक्तांना या तरुणांनी आपली ताकद दाखवून दिली आहे आणि मतं चोरता येतात, पण माणसं चोरता येत नाहीत, हे या आंदोलनाने सिद्ध केलं. राज ठाकरे यांनी म्हटलं की, 'जेन-झी'ने सरकारच्या झिंझ्या उपटल्या. देशातल्या सरकारला कसं उखडून टाकता येतं हे या तरुणाईने दाखवून दिलं. नीट परीक्षेनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या नावांचं वाचन करून एक मिनिट स्तब्धता पाळण्यात आली, हा या विजयी मेळाव्यातला सर्वात हृदयस्पर्शी क्षण होता. ज्या मुलांचे प्राण या भ्रष्ट व्यवस्थेने घेतले, त्यांच्या स्मृतीला उजाळा देतच हा विजयोत्सव साजरा झाला, हे या आंदोलनाचं वेगळेपण आहे. इथे केवळ राजकीय विजयाचा जल्लोष नव्हता, तर एका सामूहिक दुःखाला दिलेला योग्य तो सन्मान होता.

कायदेशीर दृष्टिकोनातून पाहिलं, तर हे आंदोलन आणि त्याला मिळालेलं यश भारतीय राज्यघटनेतल्या अनुच्छेद १९(१)(ब) च्या अधिकाराची पुनर्स्थापना करणारं ठरतं. दिल्ली मेट्रोची स्थानकं बंद करणं, इंटरनेट खंडित करणं, निषेधाज्ञा लागू करणं, ही सारी प्रशासकीय हत्यारं वापरूनही जेव्हा जनतेचा एकवटलेला आवाज दाबता येत नाही, तेव्हा प्रशासनाच्या अशा कृत्यांची न्यायालयीन चिकित्सा होणं गरजेचं ठरतं. लाठीचार्जविरोधातल्या दोन याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे आणि रामलीला मैदान प्रकरणातल्या (२०१२) निकालाचा आधार घेत न्यायालय या कारवाईला घटनाबाह्य ठरवेल, अशी अपेक्षा करणं गैर नाही.

आंतरराष्ट्रीय संदर्भात पाहिलं, तर हे यश श्रीलंकेतल्या २०२२ सालच्या जनआंदोलनाची आठवण करून देतं, जिथे आर्थिक संकटाविरुद्ध रस्त्यावर उतरलेल्या सामान्य नागरिकांनी अध्यक्ष गोताबाया राजपक्षे यांना देश सोडून पळून जायला भाग पाडलं होतं. तिथे कुठलाही एक पक्ष किंवा नेता आंदोलनाच्या केंद्रस्थानी नव्हता, तर जनतेचा उत्स्फूर्त रोष हेच त्या यशाचं इंजिन होतं. फिलिपाइन्समधल्या १९८६ सालच्या ईडीएसए क्रांतीतही असंच घडलं होतं. निःशस्त्र जनतेने हुकूमशहा फर्डिनांड मार्कोस यांना पदच्युत केलं होतं, कुठल्याही रक्तपाताविना. भारतातल्या या आंदोलनानेही तोच धडा पुन्हा एकदा अधोरेखित केला. जनतेचा एकवटलेला आवाज दडपशाहीपेक्षा नेहमीच बलवान असतो. नेपाळमध्येही हेच घडलं. तरुणांनी एकत्र येऊन मुरलेल्या राजकारण्यांना उखडून फेकलं. भारतात देखील हे झाल्याशिवाय राहणार नाही. पण एवढ्या आशेवर समाधान मानून चालणार नाही. एका मंत्र्याचा राजीनामा हे केवळ पहिलं पाऊल आहे. नीट परीक्षेतल्या भ्रष्टाचाराला जबाबदार असणाऱ्या सर्व यंत्रणांची सखोल चौकशी झाली पाहिजे, लाठीचार्जाचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, पुन्हा असं आंदोलन करण्याची वेळ या तरुणाईवर येऊ नये, यासाठी शिक्षण व्यवस्थेत मूलभूत सुधारणा झाल्या पाहिजेत. सोनम वांगचुक यांच्यासारख्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला रुग्णालयात दाखल व्हावं लागलं, ही या संघर्षाची किंमत होती आणि ती विसरता कामा नये. तरीही तरुणाईचं हे यश आणि त्यांचं आगळवेगळं आंदोलन कायम लक्षात ठेवून ते साजरं करण्याचा आणि त्यातून धडा घेण्याची गरज आहे. या देशातल्या तरुणाईने हे दाखवून दिलं की सत्ता कितीही ताकदवान असली, तरी एकवटलेल्या जनतेसमोर तिला झुकावंच लागतं. या लढ्यात ठाकरे बंधूंनी दाखवलेली एकजूट, त्यांनी तरुणाईच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहणं, हे महाराष्ट्राच्या राजकारणासाठी एक नवा अध्याय ठरू शकतो. श्रेय तरुणाईला आहे, ज्यांनी अश्रुधूर आणि लाठ्यांसमोरही माघार घेतली नाही आणि श्रेय त्यांच्या पाठीशी निर्भयपणे उभ्या राहिलेल्या नेतृत्वालाही आहे. इतिहास हेच सांगतो जी सत्ता तरुणाईच्या स्वप्नांवर लाठी चालवते, तिला अखेर झुकावंच लागतं आणि हा धडा या देशाने पुन्हा एकदा गिरवला आहे.

मालक, प्रकाशक आणि संपादिका मनीषा राजेंद्र प्रसाद सैनी कार्यालय क्रमांक ४, पहिला मजला, पूर्णिमा को. ऑप. सोसायटी, बाबूभाई पेट्रोल पंपासमोर, ठाणे (पश्चिम) ४००६०१, महाराष्ट्र येथून प्रकाशित झाले आहे. मुद्रक सोमाणी प्रिंटिंग प्रेस - युनिट क्रमांक ४, ग्राउंड फ्लोअर, एन.के. इंडस्ट्रियल इस्टेट, ऑफ आरे रोड, परवासी इंडस्ट्रीज इस्टेटजवळ, गेट क्रमांक २, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३ येथे छापलेले आहे., संपर्क क्रमांक : ९३७६७१३६३९, बातम्यांसाठीः newshubmarathi1823@gmail.com, जाहिरातींसाठी बुकिंगः advtnewshub021@gmail.com, आरएनआय क्रमांक - एमएएचएमएआर/२५/ए०८४९,

Owner, Publisher and Editior Manisha Rajendra Prasad Saini has publised from office no. 4, 1St floor, Poornima CHS, opp Babubhai petrol pump, Thane (W). 400601, Maharashtra. Printed at Print Somani Printing Press - Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off Arey Road, Nr. Parvasi Ind. Estate, Gate No. 2, Goregaon (E), Mumbai- 400063., Contact No. : 9376713639, For News: newshubmarathi1823@gmail.com, For Advts. Booking : advtnewshub021@gmail.com, RNI No - MAHMAR/25/A0849,

# पदकविजेत्यांचे जल्लोषात स्वागत

## ढोल-ताशांचा गजर, देशभक्तीपर गीतांचा उत्साह, खेळाडूंचा पुष्पहार घालून गौरव

**३०** लाख केंद्र शासनाकडून सुवर्णपदक विजेत्यांना | **२०** लाखांचा पुरस्कार रौप्य पदक विजेत्यांना मिळाला | **१०** एकूण पदके भारतीय बॉक्सरनी स्पर्धेत जिंकले

**दिल्ली, वृत्तसंस्था.** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून मायदेशी परतलेल्या भारतीय खेळाडूंचे मंगळवारी पहाटे राजधानीत भव्य स्वागत करण्यात आले, परंतु खेळाडूंनी हे स्पष्ट केले की त्यांच्याकडे आनंद साजरा करण्यासाठी फारसा वेळ नाही, कारण पुढील महिन्यात जपानमध्ये होणारी आशियाई क्रीडा स्पर्धा हे त्यांचे पुढील मोठे लक्ष्य आहे.

इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय (आयजीआय) विमानतळाबाहेर पडताच, खेळाडूंचे ढोल-ताशांच्या गजरात, देशभक्तीपर गीतांनी आणि पुष्पहार अर्पण करून स्वागत करण्यात आले. खेळाडूंसोबत फोटो काढण्यासाठी त्यांचे कुटुंबीय आणि समर्थक उत्सुक होते. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती बॉक्सर प्रिया घंगास म्हणाली, इतक्या मोठ्या मंचावर राष्ट्रगीत ऐकणे हा आयुष्यभर लक्षात राहणारा क्षण आहे, पण आता माझे लक्ष आशियाई क्रीडा स्पर्धेवर आहे, जिथे मला आणखी एक सुवर्णपदक जिंकायचे आहे. भारतीय बॉक्सरनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत एकूण १० पदके जिंकून एक संस्मरणीय मोहीम पूर्ण केली. महिला बॉक्सरनी सहा आणि पुरुषांनी चार पदके जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय बॉक्सिंगची वाढती ताकद दाखवून दिली. भारतीय पॅरा ॲथलेटिक्स संघानेही विक्रमी सात पदके जिंकून इतिहास रचला, ज्यामुळे भारत एकूण पदक तालिकेत चौथ्या स्थानावर पोहोचला. मंगळवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास जेव्हा खेळाडू विमानतळाच्या टर्मिनलमधून बाहेर पडले, तेव्हा ढोल आणि देशभक्तीपर गीतांच्या गजराने वातावरण उत्साहाने भरून गेले होते. पदक विजेत्यांचे त्यांच्या कुटुंबीयांनी पुष्पहार घालून उत्साहाने स्वागत केले, तर त्यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते. बॉक्सर सचिन सिवाचने भारतीय संघाच्या यशाचे श्रेय दीर्घकालीन कठोर परिश्रम आणि तांत्रिक उणिवांवर मात करण्याला दिले. तो म्हणाला, सततच्या विजयांमुळे खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि आता संपूर्ण संघ आशियाई क्रीडा स्पर्धेवर लक्ष केंद्रित करत आहे. नरेंद्र बेरवाल म्हणाला की, हे यश वैयक्तिक कामगिरीमुळे नाही, तर सुनियोजित रणनीती आणि सांघिक कामगिरीमुळे मिळाले आहे, तर रौप्य पदक विजेता जादुमणी सिंगने अंतिम फेरीत पराभूत झाल्याबद्दल खंत व्यक्त केली. तो म्हणाला, ही निराशा मला अधिक मेहनत करण्यास प्रवृत्त करेल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते हर्ष सिंग आणि अस्मिता डे हे मंगळवारी सकाळी विमानतळावरून निघणाऱ्या पहिल्या काही जणांमध्ये होते. त्यांचेही उत्साहात स्वागत करण्यात आले.

### पॅरा ॲथलीट्सही झाले सन्मानित

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सात पदके जिंकून इतिहास रचणाऱ्या भारताच्या पॅरा ॲथलीट्ससाठीही हा सोहळा विशेष होता. महिलांच्या शॉटपुट एफ५७ प्रकारातील सुवर्णपदक विजेती शर्मिला धनखर म्हणाली, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदक जिंकल्यामुळे आगामी मोठ्या स्पर्धांसाठी माझा आत्मविश्वास खूप वाढला आहे. पुरुषांच्या एफ५७ शॉटपुट प्रकारातील सुवर्णपदक विजेता सोमन राणा म्हणाला की, या यशाचे श्रेय केवळ खेळाडूंनाच नाही, तर पडद्यामागे अथकपणे काम करणाऱ्या सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही जाते.



आजारपणामुळे तयारीवर परिणाम झाला होता आणि खेळांपूर्वी तिला फक्त तीन आठवडेच सराव करता आला. रिंगमध्ये प्रवेश करताच मी बाकी सर्व काही विसरले आणि भारतासाठी माझे सर्वोत्तम देण्यावरच लक्ष केंद्रित केले. आगामी आशियाई क्रीडा स्पर्धा आणि २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणे हे त्याचे मुख्य ध्येय आहे.

जस्मिन लंबोरिया( सुवर्णपदक विजेती)

मी दररोज रात्री सुवर्णपदक जिंकण्याचे, राष्ट्रगीत ऐकण्याचे आणि असे स्वागत मिळवण्याचे स्वप्न पाहत होते. आता ते स्वप्न साकार झाले असे मत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत इंग्लंडच्या रुबी व्हाईटला पराभूत करणारी पहिली बॉक्सर ठरलेली साक्षी चौधरी म्हणाली. माझे पुढचे लक्ष्य आशियाई खेळ आहेत, जिथे मला अशीच कामगिरी पुन्हा करायची आहे.

**साक्षी चौधरी( गोल्डन बॉक्सर)**



महिलांच्या ७० किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकणारी बॉक्सर अरुंधती चौधरी म्हणाली की, गतविजेत्याला पराभूत केल्यामुळे तिचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढला आहे. या विजयामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला आहे. या वजन गटाचा आशियाई क्रीडा स्पर्धेत समावेश नाही, त्यामुळे आता माझे संपूर्ण लक्ष विश्वचषकावर असेल.



### राष्ट्रकुल पदकविजेत्यांचा केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवियांच्या हस्ते गौरव



राष्ट्रकुल स्पर्धा गाजविणारे भारतीय बॉक्सर आणि इतर पदकविजेत्यांचे पहाटे दिल्लीत आगमन झाले. यानंतर सर्व पदकविजेत्या खेळाडूंनी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेतली. यावेळी मांडविया यांनी देखील खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक केले. तसेच त्यांना रोख पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडण्याचे नबीत कौशल्य : पठाण

**दिल्ली, वृत्तसंस्था.** आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणार असलेल्या जम्मू आणि काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीची सर्वात मोठी ताकद त्याचा वेग नसून, बचावात्मक फलंदाजी करणाऱ्या अव्वल फलंदाजांना चुका करण्यास भाग पाडण्याची त्याची क्षमता असल्याचे मत भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण यांनी व्यक्त केले.

अनुभवी जसप्रीत बुमराहच्या दुखापतीमुळे, १५ ऑगस्टपासून श्रीलंकेत सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी नबीचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. पठाण यांनी २०१८ मध्ये श्रीनगर येथे झालेल्या चाचण्यांदरम्यान नबीची प्रतिभा पहिल्यांदा ओळखली होती. त्यानंतर त्यांनी जम्मू आणि काश्मीरमधील तरुण क्रिकेटपटूंना मार्गदर्शनही केले. त्यांच्या मते, नबीची नैसर्गिक गोलंदाजी शैली, मनगटाची स्थिती आणि चेंडू वळवण्याची क्षमता यामुळे तो जास्त वेगाशिवायही प्रभावी ठरतो. चेंडू स्विंग करण्यासाठी आदर्श वेग ताशी सुमारे १३५ किलोमीटर असतो, असे पठाण यांनी सांगितले. जर तुम्ही चेंडू उशिरा स्विंग करू शकलात, तर तुम्ही यशस्वी होऊ शकता. त्याची लय आणि गोलंदाजीची शैली पाहता, मला विश्वास आहे की तो नियमितपणे ताशी १३३-१३५ किलोमीटरचा वेग गाठू शकतो, असे ते म्हणाले.



पठाण यांच्या मते, वेगवान गोलंदाजी हा गोलंदाजीचा केवळ एक भाग आहे. गोलंदाजाचे खरे कौशल्य यात आहे की, तो जागतिक दर्जाच्या फलंदाजांना बचावात्मक फटके खेळण्यास कसे भाग पाडतो आणि नंतर त्यांना बाद करण्याचा मार्ग कसा शोधतो. बचाव करताना अव्वल दर्जाच्या फलंदाजांना बाद करण्याची क्षमता गोलंदाजात आहे का? हाच तो गुण आहे जो आम्ही शोधतो.

## फुकेत-दिल्ली एअर इंडिया विमानाला तीव्र टर्ब्युलन्स घटनेची गांभीर्याने दखल

# केंद्र सरकारकडून सखोल चौकशीचे आदेश

**दिल्ली,** फुकेतहून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला मंगळवारी उड्डाणादरम्यान तीव्र टर्ब्युलन्सचा सामना करावा लागल्यानंतर केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाने या घटनेची सखोल चौकशी सुरू केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे स्पष्ट करत या घटनेच्या प्रत्येक पैलूची तपासणी केली जाणार असल्याचे मंत्रालयाने सांगितले.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट रोजी फुकेतहून दिल्लीकडे येणारे एअर इंडियाचे एअरबस ए३२० विमान उड्डाणादरम्यान अचानक उंचीत बदल झाल्याने तीव्र टर्ब्युलन्समध्ये सापडले. त्यानंतर वैमानिकांनी परिस्थिती नियंत्रणात आणत विमानाचे दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सुरक्षित लँडिंग केले. विमानात १३७ प्रवासी (त्यापैकी ३ मुले) तसेच ८ कर्मचारी (२ वैमानिक आणि ६ केबिन क्रू) होते.





### डीजीसीएकडून सखोल चौकशी

नागरी उड्डाण महासंचालनालयाने (या घटनेची सविस्तर चौकशी सुरू केली आहे. चौकशीदरम्यान उड्डाणाची नोंद, हवामानाची माहिती, विमानाची तांत्रिक स्थिती, वैमानिक आणि क्रूचा अहवाल अशा सर्व बाबींचा अभ्यास केला जाणार आहे. डीजीसीमधील एका अधिकाऱ्याने सांगितले की, उड्डाणादरम्यान एका केबिन क्रू सदस्याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती वैमानिकांनी दिली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, तीव्र टर्ब्युलन्सदरम्यान विमानाला सुमारे 300 फूट उंचीची अचानक घसरण अनुभवावी लागली. मात्र, वैमानिकांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणत विमान सुरक्षितपणे दिल्लीत उतरविले.

### १२ जणांवर रुग्णालयात उपचार

लँडिंगनंतर वैद्यकीय पथकांनी सर्व प्रवासी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून ८ प्रवासी आणि ४ केबिन क्रू सदस्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्वांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे मंत्रालयाने सांगितले. एअर इंडियाने नंतर दिलेल्या अद्ययावत माहितीनुसार, या घटनेत एकूण १७ जण (१३ प्रवासी आणि ४ केबिन क्रू सदस्य) जखमी झाले. त्यापैकी ५ प्रवाशांना संध्याकाळपर्यंत रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून उर्वरितांवर उपचार सुरू आहेत.

### विमानाला तांत्रिक तपासणीसाठी हँगरमध्ये!

घटनेनंतर केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी दिल्लीतील फोर्टिस रुग्णालयाला भेट देऊन जखमी प्रवासी आणि क्रू सदस्यांची विचारपूस केली. यावेळी नागरी उड्डाण मंत्रालयाचे सचिव आणि डीजीसीएचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते. घटनेनंतर संबंधित विमानाला सविस्तर तांत्रिक तपासणीसाठी हँगरमध्ये पाठविण्यात आले आहे. तसेच विमानातील फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर सुरक्षित करण्यात आले असून त्यातील माहितीचे विश्लेषण करून उड्डाणादरम्यान अचानक उंचीत बदल का झाला आणि टर्ब्युलन्सची नेमकी कारणे काय होती, याचा शोध घेतला जाणार आहे.

# त्रिभाषा धोरणावर सुनावणीची मागणी

### कोर्ट म्हणाले, पाहूया

**दिल्ली, वृत्तसंस्था.** सीबीएसईने नववीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू केलेल्या त्रिभाषा धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात लवकर सुनावणीची मागणी करण्यात आली. याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे की, शैक्षणिक सत्र आधीच सुरू झाले आहे आणि विद्यार्थी संभ्रमात आहेत. याचिकाकर्त्यांचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी बुधवारी किंवा गुरुवारी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासमोर सुनावणी घेण्याची विनंती केली. त्यांनी असा युक्तिवाद केला की, धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शाळांमध्ये पुरेसे शिक्षक आणि अभ्यास साहित्याचा अभाव आहे. सरन्यायाधीशांनी सांगितले की, या प्रकरणाची चौकशी केली जाईल. सीबीएसईच्या एका परिपत्रकानुसार, १ जुलैपासून नववीच्या विद्यार्थ्यांसाठी किमान २ भारतीय भाषांसह तीन भाषा अनिवार्य असतील. या धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी केंद्र सरकार, एनसीईआरटी आणि सीबीएसई यांच्याकडून प्रतिसाद मागवला होता. त्यांच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये, केंद्र सरकार, सीबीएसई आणि एनसीईआरटीने बहुभाषिकता आणि राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी हे आवश्यक असल्याचे सांगून एनईपी-२०२० च्या त्रि-भाषा आराखड्याला पाठिंबा दिला. त्याच वेळी, याचिकाकर्त्यांनी असा आरोप केला आहे की सीबीएसई पुरेसे पर्याय न देता भाषांची अंमलबजावणी करत आहे आणि हे शिक्षण हक्क कायद्याच्या भावनेनुसार नाही.



### १ कोटींचे प्रतिबंधित कफ सिरप जप्त, २ अटकेत

**भुवनेश्वर.** ओडिशाच्या झारसुगुडा जिल्ह्यातील पोलिसांनी दोघांना अटक केली असून अंदाजे १ कोटी रुपयांचे प्रतिबंधित खोकल्याचे औषध (कफ सिरप) जप्त केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी बर्मल येथील तुंबेकेलाजवळ एक ट्रक थांबवून त्याची तपासणी केली असता, १९७ कार्डबोर्डच्या खोक्यांमध्ये भरलेला कफ सिरपचा साठा आढळून आला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जप्त केलेल्या मालामध्ये कोडीन फॉस्फेट आणि ट्रायप्रोलिडाइन हायड्रोक्लोराइड असलेल्या १०० मिलीच्या २३,६४० कुप्यांचा समावेश होता. अटक केलेल्या आरोपींची ओळख बिहारचा रहिवासी मोहम्मद अहसान अहमद आणि बंगालचा रहिवासी रिझवान अन्सारी अशी पटली आहे.

### आसारामच्या जामिनावर ६ ऑगस्टला सुनावणी

**दिल्ली.** जोधपूर येथील अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात दोषी ठरलेल्या आसारामच्या अंतरिम वैद्यकीय जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालय ६ ऑगस्टला सुनावणी घेणार आहे. आसारामच्या अंतरिम वैद्यकीय जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान, एम्सकडून एक सविस्तर वैद्यकीय अहवाल सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आला. अहवालात म्हटले आहे की, आसारामला सध्या रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नाही, परंतु २४ तास वैद्यकीय देखरेखीची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने अहवालाचे पुनरावलोकन करताना, त्यातील काही मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले.

**बेपर्वाई** कायमस्वरूपी पदांपेक्षा तिप्पट सल्लागारांची नियुक्ती

# सल्लागारांनी बुडवली एनटीए नौका

**दिल्ली,** देशातील सर्वांत मोठ्या आणि अत्यंत संवेदनशील प्रवेश परीक्षा आयोजित करणारी संस्था नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणानंतर मोठ्या प्रमाणावर टीकेला सामोरे जात आहे. संस्थेच्या कार्यपद्धती आणि प्रशासकीय पारदर्शकतेबद्दल प्रश्न उपस्थित होत असतानाच, आणखी धक्कादायक सत्य समोर आले आहे. शिक्षण मंत्रालयाने संसदेत सादर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, एनटीए नियमित आणि कायमस्वरूपी अधिकाऱ्यांपेक्षा तिप्पट सल्लागार नियुक्त करते. या कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या सल्लागारांवर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या होत्या. यामध्ये सुरक्षित प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी जबाबदार असलेले सल्लागार, गोपनीयता आणि डेटा सुरक्षेची जबाबदारी सांभाळणारे डेटा विश्लेषक सल्लागार, परीक्षा केंद्रांची निवड आणि देखरेख करणारे सल्लागार, तसेच कायदेशीर आणि तांत्रिक बाबींसाठी जबाबदार असलेले कायदेशीर आणि आयटी सल्लागार यांचा समावेश आहे. कायमस्वरूपी उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी कोणतीही संवर्गप्रणाली नसल्यामुळे, कंत्राटी आणि बाह्य सल्लागारांच्या मदतीने एवढी मोठी परीक्षा प्रणाली चालवणे ही एनटीएची सर्वांत मोठी कमजोरी बनली आहे.




एनटीएच्या अशा कार्यप्रणालीमुळे सर्वत्र टीका होत आहे.

### ३९ पैकी १५ स्थायी पदे रिक्त

शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार, एनटीएमध्ये महासंचालक ते वरिष्ठ अधीक्षक या पदांपर्यंत एकूण ३९ स्थायी पदे आहेत. धक्कादायक बाब म्हणजे यापैकी केवळ २४ पदे नियमित अधिकाऱ्यांनी भरलेली असून, १५ पदे रिक्त आहेत. दुसरीकडे, वरिष्ठ सल्लागारांपासून ते तरुण व्यावसायिकांपर्यंत एकूण ७३ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. याव्यतिरिक्त, आउटसोर्सिंगद्वारे १२४ कर्मचारी जोडण्यात आले आहेत.

### एनटीएच्या सध्याच्या कर्मचाऱ्यांचा संपूर्ण तपशील

**मंजूर स्थायी पदांची स्थिती**

एकूण मंजूर पदे: ३९

कार्यरत: २४

| पदाचे नाव | कार्यरत पदांची संख्या |
|---|---|
| महासंचालक | ०१ |
| सहसचिव | ०२ |
| संचालक (स्तर १४) | ०१ |
| संचालक (स्तर १३) | ०७ |
| सहसंचालक | ०६ |
| उपसंचालक | ०३ |
| सहाय्यक संचालक | ०२ |
| वरिष्ठ अधीक्षक | ०२ |
| **एकूण स्थायी कर्मचारी** | **२४** |

**कंत्राटी कर्मचारी**

एकूण पदे : ७३

| पदाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|
| महाव्यवस्थापक (दळणवळण) | ०१ |
| वरिष्ठ सल्लागार | ०१ |
| सल्लागार | ०३ |
| वरिष्ठ सल्लागार | ०५ |
| सल्लागार | ४४ |
| वरिष्ठ सॉफ्टवेअर डेव्हलपर | ०१ |
| कार्यालयीन सहाय्यक | ०१ |
| तरुण व्यावसायिक | १७ |
| **एकूण कंत्राटी कर्मचारी** | **७३** |

# दंडाधिकाऱ्यांनी मागितला अहवाल

### वैष्णोदेवी बोगस चांदी प्रकरण

**जम्मू, वृत्तसंस्था.** माता वैष्णो देवी मंदिरात ५५० कोटी रुपयांच्या कथित बोगस चांदीच्या अर्पणाच्या न्यायालयीन चौकशीला एक महत्त्वपूर्ण वळण लागले आहे. जम्मू येथील मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कटरा येथील उपअधीक्षकांना, पुरावे तत्काळ जतन करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेत नमूद केलेल्या सर्व तथ्यांची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. वकील दीपक शर्मा यांनी दाखल केलेल्या याचिकेवरून ही कार्यवाही सुरू झाली होती. त्यांनी मंदिरात भाविकांनी अर्पण केलेल्या २० टन चांदीच्या अर्पणात (कथितरित्या ५५० कोटी रुपये किमतीच्या) भेसळ, गैरव्यवहार, चोरी आणि संभाव्य अपहार झाल्याची तक्रार केली होती. दीपक शर्मा यांनी गुन्हे शाखा, आपत्कालीन गुन्हे शाखा (ईओडब्ल्यू) आणि पोलिस महानिरीक्षक (आयजीपी) यांच्याकडे तक्रार दाखल केली. गुन्हे शाखेने या तक्रारीवर प्रक्रिया करून ती गुन्हे मुख्यालयाकडे पाठवली. गुन्हे मुख्यालयाने ते विभागीय पोलिस मुख्यालयाकडे आणि त्यानंतर जम्मू विभागाच्या पोलिस महानिरीक्षकांकडे पाठवले. त्यानंतर हे प्रकरण तपासासाठी रियासीच्या वरिष्ठ पोलिस अधीक्षकांकडे सोपवण्यात आले.





# इलेक्ट्रॉनिक चिप निर्मिती युनिटला आग

**नोएडा, वृत्तसंस्था.** नोएडाच्या औद्योगिक क्षेत्रातील एका इलेक्ट्रॉनिक चिप निर्मिती युनिटला लागलेली मोठी आग विझवण्याचा प्रयत्न करत असताना ढाचा कोसळल्याने २ अग्निशमन दलाचे जवान ठार झाले आणि ३ जण जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना इकोटेक-३ औद्योगिक क्षेत्रातील आयएलजीआयएम कंपनीत घडली. आगीची माहिती मिळताच, अग्निशमन दलाची किमान ६ वाहने घटनास्थळी दाखल झाली आणि त्यांनी आग विझवण्याचे काम सुरू केले. एका पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, आग विझवत असताना एक भिंत आणि लोखंडी तुळई अचानक कोसळली, ज्यात पाच अग्निशमन दलाचे जवान गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना रुग्णवाहिकेने तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे अग्निशमन दलाचे जवान रोहित यादव आणि तीर्थपाल सिंग यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### युगांडात ट्रक-टॅक्सी अपघात; १४ ठार

**कंपाला.** युगांडामध्ये प्रवासी टॅक्सी आणि वाळूने भरलेल्या ट्रकच्या धडकेत १४ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात कलुंगू जिल्ह्यातील कामुंगा ट्रेडिंग सेंटर परिसरातील महामार्गावर घडला. ट्रक चालक घटनास्थळावरून फरार असून त्याचा शोध सुरू आहे. संपूर्ण आफ्रिकेत रस्ते अपघात ही एक मोठी समस्या आहे आणि युगांडामध्ये अशा घटना वारंवार घडतात. या अपघातांमागे अनेकदा वाहनांची खराब देखभाल, बेदरकारपणे अतिवेग आणि रस्त्यांची खराब स्थिती ही कारणे दिली जातात.

# 'मेटा' कंपनी पुन्हा चौकशीच्या फेऱ्यात

### बाललैंगिक अत्याचार जाहिराती

**दिल्ली,** बाल लैंगिक शोषण व अत्याचाराशी संबंधित कथित जाहिरातींच्या प्रकरणी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने मेटा कंपनीविरोधात चौकशी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाने ३ जुलै २०२६ रोजी बीबीसीच्या एका अहवालाची स्वतःहून दखल घेत मेटा प्लॅटफॉर्म्सला नोटीस बजावत स्पष्टीकरण मागितले होते. मेटाने आठवडाभरानंतर उत्तर सादर केले असले, तरी प्रकरणातील वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आयोगाने सखोल चौकशी करण्याचे ठरविले आहे. भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी काही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'सरकारविरोधी' आणि 'लोकशाहीविरोधी' मजकुराला प्राधान्य दिले.

### काव़ड यात्रेत उत्साहाने सहभाग



**हरिद्वार.** येथे श्रावणच्या पवित्र महिन्यात कावडिया मोठ्या उत्साहाने भगवान शिवाची मूर्ती घेऊन कावड यात्रेत सहभागी झाले. कावड यात्रा ही भगवान शिवाची पवित्र धार्मिक व वार्षिक वारी आहे, जी प्रामुख्याने श्रावण महिन्यात असते. यामध्ये भक्त भगव्या रंगाचे कपडे घालून अनवाणी चालतात आणि गंगाजल वाहून नेतात.

# रथयात्रेतील ३ रथांची चाके राष्ट्रपती भवनात प्रदर्शित

**भुवनेश्वर, वृत्तसंस्था.** पुरीच्या प्रसिद्ध वार्षिक रथयात्रेत वापरल्या जाणाऱ्या भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या तीन रथांची चाके आता राष्ट्रपती भवनात प्रदर्शित केली जाणार आहेत. जगन्नाथ मंदिर प्रशासनाचे (एसजेटीए) मुख्य प्रशासक अरविंद पाढी यांनी मंगळवारी सांगितले की, त्यांनी भुवनेश्वर येथील लोक भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन हा प्रस्ताव मांडला, ज्याला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, भगवान जगन्नाथांचा नंदीघोष, भगवान बलभद्रांचा तळध्वज आणि देवी सुभद्रा यांचा दर्पदलन या रथांची चाके नवी दिल्लीला पाठवून ओडिशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक म्हणून प्रदर्शित केली जातील. दरवर्षी रथयात्रेनंतर तिन्ही रथांचे भाग वेगळे केले जातात आणि मंदिराच्या परंपरेनुसार काही भागांचा वापर केला जातो.

# पंतप्रधानांनी केले माफ; कार्यकर्त्यांकडून मात्र शिक्षा

### सीजेपी : मुलीला धमक्या, ३ वेळा बदलले घर

**दिल्ली,** नीट पेपरफुटीविरोधात जंतर मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान आक्षेपार्ह घोषणाबाजी केल्यामुळे वादात सापडलेल्या नोएडाच्या १५ वर्षीय मुलीच्या आणि तिच्या कुटुंबाच्या अडचणी अजूनही कायम आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिला एक भरकटलेली मुलगी म्हणून ओळख देऊन जाहीरपणे माफी दिली असली तरी, कार्यकर्ते आणि समाजकंटकांच्या छळामुळे तिच्या कुटुंबाला एकामागून एक घर बदलावे लागत आहे. मुलीचे वकील अनिल कुमार यांच्या म्हणण्यानुसार, झिरो एफआयआरमध्ये घराचा पत्ता लीक झाल्यापासून अज्ञात व्यक्ती, पोलिस अधिकारी आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सतत त्यांच्या घरी येत आहेत.



भारतातील आघाडीच्या लक्झरी ओकेजन वेअर आणि ब्रायडल कूटूर ब्रँडपैकी एक असलेल्या 'कल्की'ने, ईशान खट्टर आणि जान्हवी कपूर यांना 'ब्राइड अँड ग्रूम कूटूर '२६' चे चेहरे म्हणून घोषित केले आहे. ब्रँडचे नवीन सदिच्छादूत म्हणून, हे दोघे 'कल्की'च्या नवीनतम वधू आणि वर संग्रहाच्या मोहिमेचे नेतृत्व करतील आणि महिला व पुरुषांच्या श्रेणीतील वधू आणि ओकेजन-वेअर मोहिमांचे नेतृत्व करतील. एकत्रितपणे, ते त्या आधुनिक वधू आणि वरांचे प्रतीक आहेत, ज्यांच्यासाठी हा संग्रह तयार करण्यात आला आहे. आत्मविश्वासू, अभिव्यक्त आणि परंपरेत रुजलेले, तरीही नि:संशयपणे समकालीन.



# जान्हवी कपूर-ईशान खट्टर वधू-वराच्या वेशात?

मोहिमेच्या पहिल्या लूकच्या अनावरणासोबतच ही घोषणा करण्यात आली आहे - या क्षणामध्ये ईशान खट्टर शँपेन रंगाच्या समारंभीय अचकनमध्ये आणि जान्हवी कपूर गडद मरून रंगाच्या वधूच्या लेहेंग्यात दिसत आहेत. 'ब्राइड अँड ग्रूम कूटूर'२६' नावाच्या या मोहिमेसाठी एका भव्य ऐतिहासिक पार्श्वभूमीवर छायाचित्रित केलेला हा सुरुवातीचा लूक, या सीझनचा सूर निश्चित करतो: समकालीन दृष्टिकोनातून पुनर्कल्पित केलेली पारंपरिक कलाकुसर, ज्याच्या केंद्रस्थानी शांत प्रणय आहे.

## सुरुवातीचे प्रकरण

या मोहिमेची सुरुवात परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील एका विचारपूर्वक संवादाने होते. ईशान खट्टर शँपेन रंगाच्या समारंभीय अचकनमध्ये दिसतो, तर जान्हवी कपूर त्याला साजेसा असा गडद मरून रंगाचा वधूचा लेहेंगा परिधान करते आणि हे दोघे मिळून 'ब्राइड अँड ग्रूम कूटूर '२६' साठी एक वातावरण तयार करतात. एका भव्य पारंपरिक पार्श्वभूमीवर छायाचित्रित केलेला हा सुरुवातीचा अध्याय, उत्कृष्ट कारागिरी, समकालीन डिझाइन आणि आधुनिक भारतीय उत्सवाच्या भावनेने आकारलेल्या जगाची एक प्राथमिक झलक देतो. जसजशी ही कथा पुढे सरकते, तसतसे हे कलेक्शन आधुनिक वधू आणि वरांसाठी असलेल्या 'कल्की'च्या दृष्टिकोनाची अधिक रूपे प्रकट करेल. प्रत्येक अध्याय परंपरा, ही जोडी जाणीवपूर्वक जुळवलेली आहे. इशान खट्टर आणि जान्हवी कपूर अशा पिढीचे प्रतिनिधित्व करतात, जी रूढींच्या पलीकडे जाऊन उत्सव साजरा करते. परंपरेला पुढे नेत तिला स्वतःची अशी एक नवी ओळख देते. त्यांचा सहजपणा, त्यांचे वेगळेपण आणि भारतीय कारागिरीबद्दलची त्यांची खरी प्रशंसा, या जोडप्याच्या 'कल्की' डिझाइन्समध्ये प्रतिबिंबित होते. हे डिझाइन्स अशा लोकांसाठी आहेत, ज्यांना पारंपरिक आणि आधुनिक फॅशन यांचा अस्सलपणा आणि सहजतेने संगम हवा आहे.

> माझ्यासाठी, फॅशन म्हणजे ती घातल्यावर तुम्हाला कसं वाटतं, हेच नेहमी महत्त्वाचं राहिलं आहे. मला 'कल्की'बद्दल आवडणारी गोष्ट म्हणजे, यातील प्रत्येक पीसमध्ये आपल्या परंपरांचं सौंदर्य जपलेलं आहे आणि तरीही तो सहजसुंदर व आधुनिक वाटतो. असा एखादा पोशाख परिधान करण्यात एक वेगळीच मजा आहे, जो तुम्हाला एकाच वेळी मोहक, सुंदर आणि आत्मविश्वासपूर्ण वाटायला लावतो. हे कलेक्शन माझ्यासाठी नेमकं तेच करतं, आणि प्रत्येकाने याचा अनुभव घ्यावा यासाठी मी आतुरतेने वाट पाहत आहे.
> – जान्हवी कपूर

> माझा नेहमीच विश्वास राहिला आहे की, जेव्हा स्टाईल सहज आणि तुमच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशी वाटते, तेव्हाच ती सर्वात जास्त बोलते. 'कल्की'बद्दल मला जी गोष्ट विशेष आवडते, ती म्हणजे परंपरेच्या बंधनात न अडकता तिला स्वीकारण्याची तिची पद्धत. हे कपडे परिधान केल्यावर मला नैसर्गिक, अभिव्यक्त आणि अगदी माझ्या व्यक्तिमत्त्वाशी जुळणारे वाटले. कालातीत गोष्टींमध्ये रुजलेली राहूनही व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणाऱ्या या प्रवासाचा भाग बनताना मला खूप आनंद होत आहे.
> – इशान खट्टर

# 'बिग बॉस हिंदी'ची ऑफर आली होती, पण...'

'बिग बॉस' सीझन २०ची नुकतीच घोषणा झाली आहे. लवकरच या लोकप्रिय कार्यक्रमाचा नवा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नवीन थिमसह 'बिग बॉस' पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. नुकताच सलमान खानचा पहिला प्रोमो प्रसारित झाला आहे. त्यामुळे यंदाच्या पर्वात कोणते सेलिब्रिटी झळकणार याबद्दल आता प्रेक्षकांमध्ये उत्सुक्ता निर्माण झाली आहे. अशातच आता लोकप्रिय अभिनेत्री छाया कदम यांनीसुद्धा त्यांना 'बिग बॉस' हिंदीची ऑफर आल्याची माहिती दिली आहे.



## छाया कदम यांनी मुलाखतीत सांगितले नकार देण्यामागचे कारण

छाया कदम यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्यांना 'बिग बॉस' हिंदीसाठी विचारणा झाल्याचा खुलासा केला आहे. यावेळी त्यांनी रिॲलिटी शोबद्दलचं त्यांचं मतही व्यक्त केलं आहे. छाया कदम यांना 'बिग बॉस' हिंदीसाठी विचारणा कधी झाली होती आणि त्यांनी नकार का दिला याबद्दल सांगितलं आहे. त्या नेमकं काय म्हणाल्या जाणून घेऊयात...

## छाया कदम यांनी बिग बॉस हिंदीच्या ऑफरबद्दल दिली प्रतिक्रिया

रिॲलिटी शोच्या ऑफर आल्या आहेत का असं विचारल्यानंतर छाया कदम 'बिग बॉस'च्या ऑफरबद्दल म्हणाल्या, खरं सांगायचं तर मला हिंदी बिग बॉसची ऑफर आली होती. मी कान्समध्ये पहिल्यांदा गेले होते तेव्हा मला ऑफर आली होती. तेव्हा त्यांना असं वाटत होतं की मी बिग बॉसमध्ये सहभाग घ्यावा आणि त्यांनी त्यासाठी खूप प्रयत्नही केले, पण मला नाही जमलं. कारण माझं असं होतं की नाही आता तरी मला नाही करायचं आहे. पण हो हिंदी बिग बॉसची ऑफर आली होती. पुढे रिॲलिटी शोबद्दल काय मत आहे असं विचारल्यानंतर छाया कदम म्हणाल्या, मला असं वाटतं की तुमच्या खासगी गोष्टी ज्या तुम्हालाच माहीत असतात, ज्या तुमच्याच आहेत त्याबद्दल मी जगासमोर का बोलू. त्यामुळे मी त्यांना सांगितलं की नाही मला नाही करायचा आहे. लोकांना खूप आवडतो. मी त्यांना सांगितलं की तुमचा टीआरपी वगैरे खूप छान आहे.

### हास्यजत्रेतील कलाकार चांगले काम करतात!

- छाया कदम पुढे म्हणाल्या, मी जरी नाही म्हटलं असलं तरी माझ्या आजुबाजूचे लोक बिग बॉस बघतात. माझी मावशी खूप बघते. माझं ऐकत नाही तिला खूप आवडतं. पुढे त्यांना तुम्ही काय बघता, कोणता रिॲलिटी शो बघता असं विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, मी आमच्या मराठीतील महाराष्ट्राची हास्यजत्रा बघतो. कारण त्यातील लोक खूप चांगलं काम करतात. हसवता हसवता सामाजिक मेसेजही देतात.



# 'समर्थ'चा दमदार ट्रेलर

ट्रेलरमधून ही कथा एका सामान्य कुटुंबाची असल्याचे दिसतेय. आयुष्याच्या एका टप्प्यावर अध्यात्माचा स्वीकार करणारे वडील आणि त्यांच्या विचारांना विरोध करणारा मुलगा यांच्यातील संघर्ष अधिक यात ठळकपणे समोर येतो. बदलत्या काळात नात्यांमधील संवाद कसा हरवत चालला आहे, कुटुंबात निर्माण होणारा दुरावा किती खोलवर जातो आणि अशा वेळी समर्थ रामदास स्वामींची शिकवण माणसाला स्वतःकडे नव्याने पाहण्याची ताकद कशी देते, याची भावनिक आणि प्रेरणादायी झलक ट्रेलरमध्ये अनुभवायला मिळते.केवळ अध्यात्माची मांडणी न करता, आधुनिक जीवनातील वास्तव, भावनिक संघर्ष, नात्यांचे बदलते स्वरूप आणि जीवनमूल्यांचे महत्त्व यांचा समतोल साधणारी कथा ट्रेलरमधून प्रभावीपणे उलगडते. प्रत्येक प्रसंगातून प्रेक्षकांना स्वतःच्या आयुष्याशी नाते जोडता येईल, अशी आशयघन मांडणी या ट्रेलरमध्ये दिसून येते.

**आजच्या पिढीच्या प्रश्नांना समर्थ विचारांतून उत्तर**



आजच्या या तरुण पिढीवर छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा पडणारा प्रभाव आणि विचारांमधून समाजात होणारा सकारात्मक बदल यावर भाष्य करणारा 'जयंती' हा चित्रपट २०२१ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला होता. आता तब्बल पाच वर्षांनंतर या चित्रपटाचा सिक्वल म्हणजेच 'जयंती २' हा चित्रपट येत्या ११ सप्टेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यास सज्ज झाला आहे.

# 'जयंती-२' संत्या स्वीकारणार एक ज्वलंत चॅलेंज!

'जयंती २' या चित्रपटाची निर्मिती मेलिओरिस्ट फिल्म स्टुडिओने केली असून चित्रपटाची कथा, संवाद आणि दिग्दर्शन शैलेश बळीराम नरवाडे यांचे आहे. 'जयंती' चित्रपटाचा प्रमुख चेहरा असलेला अभिनेता ऋतुराज वानखेडे या चित्रपटात मध्यवर्ती भूमिका साकारत असून अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर, रोहिणी हट्टंगडी, देविका दफ्तरदार, विजय निकम, राजकुमार जरांगे, मानसी सुभाष अशी दमदार कलाकारांची फौज आपल्याला या चित्रपटातून भेटीस येणार आहे. संजीवकुमार हिल्ली यांनी कॅमेरामन म्हणून काम पाहिले असून संकलन फैसल महाडिक यांचे आहे. डॉ. सुहास अंबादे, सुहास मुंडे आणि सौरभ गुरु यांनी लिहिलेल्या गीतांना ओंकारस्वररूप यांचे संगीत लाभले असून पार्श्वसंगीत मंगेश धाकडे यांचे आहे.

## प्रेक्षकांना 'जयंती-२' नक्कीच आवडेल : नरवाडे

'जयंती' चित्रपटाच्या पहिल्या भागाला त्याच्या वेगळ्या विषयामुळे रसिक प्रेक्षकांचा चित्रपटाला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. मुख्यतः चित्रपटाचा विषय हा विशेषतः तरुणाईच्या मनाला भिडला होता. त्याच्या मनात असलेली भावना ही चित्रपट माध्यमातून .दाखविण्यात आली होती. 'जयंती २' च्या चित्रीकरणाला सुरुवात झाली तेव्हा पासूनच प्रेक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली होती. आता 'जयंती २' मध्ये नक्की काय घडणार? कथानक कोणते रंजक वळण घेणार? यासाठी रसिक प्रेक्षकांना अजून थोडी वाट पाहावी लागणार असून मला खात्री आहे की प्रेक्षकांना 'जयंती २' नक्कीच आवडेल असे चित्रपटाचे दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांनी सांगितले.

## हेल्थ & फिटनेस



### लक्षपूर्वक खा, निरोगी रहा

# माइंडफुल इटिंगचे फायदे

**माइंडफुल इटिंग म्हणजेच सजगपणे आणि लक्षपूर्वक अन्न खाण्याची पद्धत. बदलत्या काळात आरोग्यविषयक संकल्पनांमध्ये या गोष्टीला प्रचंड महत्त्व दिले जात आहे. या निरोगी जीवनशैलीची सुरुवात आपण काही विशिष्ट आणि पौष्टिक स्नॅक्सच्या निवडीने करू शकतो.**

## भाजलेले मखाने

मखान्यांमध्ये कॅलरीजचे प्रमाण अत्यंत कमी आणि फायबर तसेच प्रथिनांचे (प्रोटीन) प्रमाण जास्त असते. थोडेसे तूप आणि जिरे-मिरी पूड घालून भाजलेले मखाने खाल्ल्याने पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि अवाजवी खाण्याची इच्छा नियंत्रित होते.

## मोड आलेली कडधान्ये



मूग, मटकी यांसारख्या मोड आलेल्या कडधान्यांमध्ये फायबर आणि प्लांट-बेस्ड प्रोटीन भरपूर प्रमाणात असते. यात बारीक चिरलेला टोमॅटो, कांदा आणि कोथिंबीर मिसळून तयार केलेले चाट चविष्ट तर असतेच, शिवाय पचनक्रियाही सुधारेल अशी त्याची रचना असते. भाजलेले चणे हा खिशाला परवडणारा आणि अत्यंत पौष्टिक असा पारंपरिक भारतीय पदार्थ आहे. या चण्यांमध्ये कॉम्प्लेक्स कार्बोहायड्रेट्स आणि प्रोटीन असतात, जे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढू न देता शरीराला स्थिर ऊर्जा पुरवतात.

## मोबाईलपासून दूर राहा

माइंडफुल इटिंग यशस्वी करण्यासाठी स्नॅक्स खाताना टीव्ही पाहणे, मोबाईल स्क्रोल करणे किंवा काम करणे पूर्णपणे टाळले पाहिजे. कोणत्याही विचलित करणार्या घटकांशिवाय, शांत चित्ताने, अन्नाचा सुगंध आणि चव घेत, प्रत्येक घास व्यवस्थित चावून खाल्ल्यास शरीराला अन्नाचे पोषक घटक योग्य प्रकारे शोषून घेता येतात.

## भिजवलेला सुकामेवा आणि बिया



बदाम, अक्रोड यांसारखा सुकामेवा आणि भोपळ्याच्या बिया, अंबाडीच्या बिया (फ्लॅक्स सीडस) किंवा चिया सीडस हे निरोगी फॅट (ओमेगा 3 फॅटी ॲसिड) आणि ऊर्जेचा उत्तम स्त्रोत आहेत. मूठभर मिश्र सुकामेवा खाल्ल्याने शरीराला त्वरित ऊर्जा मिळते आणि मेंदूचे आरोग्य सुधारते.

फळे संथ गतीने चावून खा : सफरचंद, पेरू किंवा नाशपाती यांसारखी फायबरयुक्त फळे संथ गतीने चावून खाल्ल्याने तृप्तीची भावना लवकर निर्माण होते. तसेच काकडी, गाजर आणि बीट यांचे सॅलड लिंबू पिळून खाल्ल्याने शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मिळतात.

# दिवसभर थकवा, सुस्ती येण्याकडे दुर्लक्ष नको

आजच्या धावपळीच्या जीवनात थकवा आणि सुस्ती ही सामान्य समस्या मानून अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. कामाचा ताण, अपुरी झोप किंवा हवामानातील बदल यामुळे असं होत असेल, असं समजून ही लक्षणं दुर्लक्षित केली जातात. मात्र,





## 'या' गंभीर आजारांचे सुरुवातीचे लक्षण असू शकते

सतत थकवा जाणवणं हे केवळ अशक्तपणाचं लक्षण नसून शरीरात विकसित होत असलेल्या काही आजारांचे सुरुवातीचे संकेतही असू शकतात. खासकरून लठ्ठपणा आणि त्यासंबंधित आजारांचा परिणाम सर्वप्रथम शरीराच्या ऊर्जा पातळीवर दिसून येतो. वजन वाढल्यामुळे शरीरातील विविध अवयवांवर अधिकचा ताण येतो, त्यामुळे व्यक्तीला लवकर थकवा येतो आणि दिवसभर सुस्ती जाणवते.

## आजारांचा धोका वाढू शकतो

चुकीचा आहार, शारीरिक हालचालींचा अभाव, मानसिक ताण आणि अपुरी झोप ही सतत थकवा जाणवण्याची मुख्य कारणे मानली जातात. याकडे दुर्लक्ष केल्यास डायबिटीस, हाय ब्लड प्रेशर, फॅटी लिव्हर आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे ही समस्या सामान्य समजून दुर्लक्षित करू नये.

## डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?

जर सतत थकवा जाणवत असेल, तर त्यामागील कारण शोधण्यासाठी वैद्यकीय तपासणी करून घेणं आवश्यक आहे.

पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असून सर्वत्र आल्हाददायक वातावरण सुरू आहे. परंतू पावसाळ्याचा ऋतू जितका आल्हाददायक असतो, तितकाच तो आरोग्याच्या दृष्टीने आव्हानात्मक मानला जातो. या दिवसांत हवामानातील दमटपणा मुळे पचनसंस्था मंदावते आणि विविध संसर्गाचा धोका वाढतो. अशा वेळी रोजच्या आहारात पालेभाज्या खाव्यात की कडधान्ये? असा प्रश्न अनेकांना पडतो. आरोग्यतज्ज्ञांच्या मते कडधान्ये की पालेभाज्या, पावसाळ्यात शरीरासाठी काय योग्य हे जाणून घेऊयात.

# पावसाळ्यात काय खावे कडधान्ये की पालेभाज्या?

- **पालेभाज्या खाणे किती सुरक्षित? :** पावसाळ्यात पालक, मेथी, लाल माठ यांसारख्या पालेभाज्यांमध्ये बॅक्टेरिया, बुरशी आणि कीटकांची अंडी साचण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे शक्यतो टाळावे. यासह दमट वातावरणामुळे या दिवसात पालेभाज्या लवकर खराब होतात.
- **तज्ज्ञ यावर काय सांगतात? :** पावसाळ्यात कच्च्या किंवा अर्धवट शिजवलेल्या पालेभाज्या खाणे टाळावे. जर पालेभाज्या खायच्या असतील तर त्या कोमट मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून, योग्य प्रकारे शिजवूनच खाव्यात.
- **कडधान्ये खाणे किती सुरक्षित? :** पावसाळ्यात पालेभाज्यांच्या तुलनेत कडधान्ये जसे की मूग, मटकी, हरभरा, मसूर अधिक सुरक्षित मानली जातात. कडधान्यांमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन्स, फायबर आणि जीवनसत्त्वे असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.
- **काळजी काय घ्याल? :** पावसाळ्यात पचनशक्ती मंद असल्यामुळे कडधान्ये नीट भिजवून, मोड आणून आणि व्यवस्थित शिजवून खावीत. कच्ची मोड आलेली कडधान्ये खाणे टाळावे, कारण यामुळे पोटाचे आरोग्य बिघडू शकते.

# पर्फ्यूम लावणे धोकादायक

### संशोधनाचा दावा



परफ्यूमचा सुगंध अनेकांना आवडतो आणि त्यामुळे अनेकजण दररोज त्याचा वापर करतात. घामाची दुर्गंधी येऊ नये हेही परफ्यूम वापरण्याचा एक मोठे कारण असते. बहुतेक लोक मानेवर परफ्यूम स्प्रे करतात, पण ही सवय आरोग्यासाठी नेहमीच सुरक्षित असेल असे नाही, याबाबत जाणून घेऊया.

### काय सांगते संशोधन?

# रक्तदानापासून रक्त चढवण्यापर्यंत!

## प्रत्येक रक्ताच्या युनिटला सुरक्षित बनवणाऱ्या चाचण्या

ग्णापर्यंत पोहोचण्यापूर्वी रक्ताच्या प्रत्येक युनिटवर केवळ रक्तगट तपासणी केली जाते असे नाही. त्यामागे रक्तदात्याचे मूल्यांकन, संसर्गजन्य रोगांची तपासणी, इम्युनोहेमॅटोलॉजी चाचण्या, कॉम्पॅटिबिलिटी स्टडीज, गुणवत्ता नियंत्रणाच्या प्रक्रिया आणि आधुनिक तांत्रिक सुरक्षा प्रणालींचे अनेक स्तर कार्यरत असतात. रुग्णाच्या बेडजवळ टांगलेली रक्ताची बॅग बहुतेक वेळा कुणाच्याही विशेष लक्षात येत नाही. रुग्णाच्या कुटुंबीयांना त्यात आशा दिसते. डॉक्टरांसाठी ते उपचाराचा एक महत्त्वाचा भाग असतो. पण एक पॅथॉलॉजिस्ट म्हणून मला त्यामागचा एक वेगळाच प्रवास दिसतो. असंख्य तपासण्या, पडताळण्या आणि अनेक महत्त्वाचे निर्णय, ज्यांची सुरुवात हे रक्त रुग्णापर्यंत पोहोचण्याच्या खूप आधीच झालेली असते. याविषयी डॉ. पूजा त्रेहन, कन्सल्टंट पॅथॉलॉजिस्ट आणि झोनल चीफ ऑफ लॅब्स उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड, मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेड यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

आधुनिक वैद्यकशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या उपचारांमध्ये रक्त हे एक वेगळंच माध्यम आहे. ते कोणत्याही कारखान्यात तयार करता येत नाही, कृत्रिमरित्या बनवता येत नाही किंवा गरज पडेल तेव्हा निर्माण करता येत नाही. ते पूर्णपणे रक्तदात्यांच्या नि:स्वार्थ दानावर अवलंबून असते. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) माहितीनुसार, जगभरात दरवर्षी सुमारे 12 कोटी रक्तदान केले जाते. त्यामुळे स्वयंप्रेरणेने रक्तदान करणारे लोक हे जगातील आरोग्य व्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत. WHO च्या ताज्या आकडेवारीनुसार, आज जगभरातील 85% पेक्षा जास्त रक्तदान हे स्वयंप्रेरणेने आणि कोणतेही मानधन न घेणाऱ्या रक्तदात्यांकडून केले जाते, ही सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील एक मोठी उपलब्धी मानली जाते.

# रात्री तासन्तास झोप येत नाही?

दिवसभराच्या धावपळीनंतर रात्री अंथरुणावर पडल्यावरही अनेकांना झोप लागत नाही. मोबाईल स्क्रोल करणे, कामाचा ताण, भविष्याची चिंता किंवा सतत सुरू असलेले विचार यामुळे झोपेचा दर्जा खालावतो. आणि अपुऱ्या झोपेमुळे दुसऱ्या दिवशी थकवा, चिडचिड जाणवू लागते. अशा परिस्थितीत सोशल मीडियावर आणि आरोग्यविषयक चर्चांमध्ये 'मिलिटरी स्लीप मेथड' ही पद्धत मोठ्या प्रमाणात चर्चेत आली आहे. नियमित सराव केल्यास कमी वेळात झोप लागण्यास ही पद्धत मदत



## काय आहे 'मिलिटरी स्लीप मेथड'?

ही एक रिलॅक्सेशन टेक्निक आहे. शरीरातील ताण कमी करून मन शांत करण्यावर या पद्धतीचा भर असतो. असे मानले जाते की, ही पद्धत अमेरिकन लष्करातील वैमानिकांना कमी वेळेत झोप लागावी आणि कठीण परिस्थितीतही पुरेशी विश्रांती मिळावी यासाठी विकसित करण्यात आली होती.

### ही पद्धत करून पाहायची असेल तर

- आरामदायी स्थितीत झोपा आणि डोळे बंद करा.
- सर्वप्रथम चेहरा, जबडा आणि डोळ्यांभोवतीचे स्नायू पूर्णपणे सैल सोडा.
- त्यानंतर खांदे, हात आणि तळहात रिलॅक्स करा.
- खोल श्वास घ्या आणि हळूहळू सोडा.
- छाती, पोट, पायांमधील ताण कमी करा.

# चालताना 'या' चुका टाळा



**रोज पायी चालणं आरोग्यासाठी चांगलं असतं आणि हा सगळ्यात सोपा व्यायाम मानला जातो. डॉक्टरांपासून ते फिटनेस एक्सपर्टपर्यंत सगळेच रोज थोडा वेळ वॉक करण्याचा सल्ला देतात. चालणं महत्वाचं आहेच, त्यासोबतच चालण्याची योग्य पद्धतही तेवढीच महत्वाची आहे. जर आपण योग्य पद्धतीने चालत नसाल तर फायद्यांऐवजी नुकसानच अधिक होतं. कळत-नकळत बरेच लोक वॉक करताना काही चुका करतात, ज्यामुळे जॉइंट्स आणि पोश्चरवर वाईट प्रभाव पडतो. पाहुयात चालताना कोणत्या चुका केल्या जातात, ज्या टाळाव्यात.**

**हळूहळू चालणे :** जर आपण वॉकच्या नावावर केवळ हळूहळू चक्कर मारत असाल तर याने शरीराला काही फायदा मिळणार नाही. काही शोधांमधून समोर आलंय की, स्लो चालण्याचा थेट संबंध डिमेंशियाच्या वाढत्या धोक्याशी असू शकतो. अनेकदा डिमेंशियाची लक्षणं समोर येण्याच्या अनेक वर्षांआधीच व्यक्तीचा चालण्याचा स्पीड स्लो होऊ लागतो. त्यामुळे चालण्याचा स्पीड वाढवा, जेणेकरून हार्ट रेट वाढेल आणि मेंदूलाही पूर्ण फायदा मिळेल.

- **पुढे वाकून चालणे :** तासंतास खुर्चीवर बसून राहिल्याने पाठीचा वरचा भाग बाहेरच्या बाजूने वर येतो. याचा प्रभाव आपल्या चालण्याच्या पद्धतीवरही दिसतो. अनेक लोक चालताना आपल्या शरीराचा वरचा भाग समोर वाकवून चालतात. वॉक करताना मधे मधे आपलं पोश्चर चेक करत रहा.
- **हातात फोन घेऊन चालणे :** हल्ली गार्डनमध्ये बघायला मिळतं की, लोक चालताना सुद्धा फोनमध्ये रील्स स्क्रॉल करतात किंवा टेस्टिंग करतात. जेव्हा आपण खाली फोनकडे बघत चालता, तेव्हा मान, पाठ आणि हिप्सवर एक्स्ट्रा दबाव पडतो. ज्यामुळे वेदना सुरू होतात. तसेच खाली बघितल्याने आपण पडण्याचा किंवा कुणाला टक्कर मारण्याचाही धोका असतो. सगळ्यात मोठी बाब म्हणजे फोनमध्ये बिझी राहिल्याने आपण कॉग्निटिव्ह ब्रेक मिस करतो.
- **पाय घासत चालणे :** अनेकांना सवय असते की, ते चालताना पाय घासत चालतात, ज्याला शफलिंग म्हटलं जातं. एका योग्य वॉकमध्ये आधी टाचा जमिनीला टेकतात, नंतर पाय सरळ होता आणि पुढे रोल होतो आणि मग अंगठ्याने शरीर पुढे सरकतं.